# News Paper Clippings 2021-22

सकाळ TODAY
शनिवार, २ जुलै २०२२ २

## ‘छत्रपती शाहू महाराजांचा विचार प्रेरणादायी’

सकाळ वृत्तसेवा

किर्लोस्करवाडी, ता. १ : छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांविषयी केलेले कार्य आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे. त्यांनी मांडलेला स्त्री-पुरुष समानता हा मानवमुक्तीचा विचार आजच्या पिढीला मार्गदर्शक आहे. शाहू महाराजांनी लागू केलेला कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अमलात आणला. त्याचा फायदा आजच्या काळामध्ये महिलांना होत असल्याचे मत शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी व्यक्त केले.



किर्लोस्करवाडी : मनोगत व्यक्त करताना डॉ. भारती पाटील. व्यासपीठावर प्राचार्य एल. डी. कदम, डॉ. सचिन चव्हाण आदी.

रामानंदनगर-बुर्ली येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचा राज्यशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई पवार अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती व स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त ‘राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक विचार’ या विषयावर महाविद्यालयामध्ये एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली होती, यावेळी त्या बोलत होत्या.

शाहू महाराजांचे विचार आजच्या पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहेत, अशा पद्धतीचा मनोदय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केला. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, डॉ. टी. एस. भोसले उपस्थित होते. डॉ. सचिन चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. विनोद वानखेडे यांनी करून दिला. डॉ. अश्विनी तातुगडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शीतल पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA RAMANANDNAGAR (BURLI)



रामानंदनगर : येथील महाविद्यालयात योगा प्रशिक्षण शिबिर पार पडले.

# डॉ. कदम महाविद्यालयात योगा शिबिर

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात २१ जूनरोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योगा दिनाच्या पार्श्वभूमीवर योगा प्रशिक्षण शिबिर पार पडले. यावेळी योग गुरू पांडुरंग चव्हाण यांनी योगामुळे निरोगी कसे राहता येईल, शरीरामधील ऊर्जा कशी वाढवता येईल, योगा प्रात्यक्षिक, ध्यान मुद्रा, प्राणायाम, योगासन आदींबाबत सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी सुनील फाटक, बाळकृष्ण काळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन जिमखाना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, योगा सेंटर, हेल्थ सेंटर यांनी केले.

आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

सकाळ 06/06/2022

सकाळ

# रामानंदनगरमध्ये सायकल रॅली

**दुधोंडी :** जागतिक सायकल दिनानिमित्त रामानंदनगरमध्ये सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या सूचनेनुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायकल चालविण्याचे महत्त्व समजावण्यात आले. सायकल चालवणे हा शरीरासाठी एक पूरक असा व्यायामप्रकार आहे, असे मत प्राचार्य डॉ. कदम यांनी व्यक्त केले. रामानंदनगर परिसरामध्ये सायकल रॅली काढून पर्यावरणाबाबत व जागतिक सायकल दिनाचे महत्त्व समजण्यात आले. या रॅलीचे नियोजन राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, जिमखाना विभाग यांनी संयुक्तरित्या केले.

Sangli, Sangli-Today
06/06/2022 Page No. 3

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ दि. 05/06/2022

सकाळ



किर्लोस्करवाडी : अभिरूप संसदेमध्ये सहभागी विद्यार्थी, प्राचार्य एल. डी. कदम, शिक्षक डॉ. सचिन चव्हाण, विद्यार्थी.

# विद्यार्थ्यांची अभिरूप संसद

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर बुर्ली येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने बेस्ट प्रॅक्टिस उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची अभिरूप संसद भरवली होती. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संसदेची माहिती समजली. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्राचार्य कदम अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, असे नाविन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नेहमी आयोजित केले जातात. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये केला पाहिजे. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, डॉ. अशोक खाडे, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. शीतल पाटील, प्रा. विनोद वानखेडे, प्रा. बी. डी. पाटील, प्रा. सतीश मस्के उपस्थित होते. संयोजन राज्यशास्त्र विभागाने केले. प्रा. डॉ. सचिन चव्हाण यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
05/06/2022 Page No. 4

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
...NAGAR (BURLI)

पुढारी दिनांक 04/06/2022

# डॉ. कदम महाविद्यालयात सायकल रॅली

पलूस : पुढारी वृत्तसेवा

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगरमध्ये जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. सायकल चालवणे हा शरीरासाठी एक पूरक असा व्यायामप्रकार आहे, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कदम यांनी व्यक्त केले. रामानंदनगर परिसरामध्ये सायकल रॅली काढून समाजामध्ये पर्यावरणाबाबत व जागतिक सायकलदिनाचे महत्त्व सांगण्यात आले. या रॅलीचे नियोजन राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, जिमखाना विभाग यांनी संयुक्तरित्या केले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA
LIBRARY

सकाळ » TODAY

गुरुवार,
२ जून २०२२

# विद्यार्थ्यांनी दैववादी नव्हे ध्येयवादी व्हावे

## आमदार अरुण लाड : डॉ. कदम महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**किर्लोस्करवाडी, ता. १:** "बहुजन समाजातील तरुणांनी शिक्षणाकडे लक्ष द्यावे. त्यांनी दैववादी न होता ध्येयवादी व्हावे. देशातील धार्मिकदृष्ट्या विद्वेष पसरविणाऱ्या घटनांकडे दुर्लक्ष करून सहिष्णुवृत्तीने वागावे. काळाच्या कसोटीवर विद्यार्थी टिकेल. असे जीवनावश्यक ज्ञान देण्यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्न करावेत," असे मत आमदार अरुण लाड यांनी व्यक्त केले.



**किर्लोस्करवाडी : पदवीधर आमदार अरुण लाड मनोगत व्यक्त करताना. व्यासपीठावर महेंद्र लाड, प्राचार्य एल. डी. कदम आदी.**

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, "चांगले खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी शासन सातत्याने आवाहन करत आहे. विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षणात क्रीडा व कला विषयांना महत्त्व दिले जाणे, काळाची गरज आहे. तुम्ही प्राध्यापक, लोकशिक्षक व्हा, म्हणजे मुले विद्यार्थी होतील. तुम्ही शिक्षकांनी शक्ती पणाला लावा, आव्हान म्हणून पेला आपोआप विद्यार्थी घडतील. आमची मुले चांगले शिकवा. केवळ वीस टक्केच विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान मिळते, ८० टक्के विद्यार्थ्यांना हवे त्या प्रमाणात मिळत नाही. विद्यार्थ्यांनो, ध्येयापर्यंत पोहोचा. एकविसाव्या शतकात तुम्हा सक्षम व्हाल असे शिक्षण घ्या."

यावेळी सुप्रसिद्ध कथाकथनकार जयवंत आवटे यांचे कथाकथन झाले. यावेळी महेंद्र लाड म्हणाले, "विद्यार्थ्यांना ऊर्जा व दिशा देण्याचे काम महाविद्यालये करत असतात. या विद्यालयात चांगले विद्यार्थी घडत आहेत. आयुष्यात खेळाचे महत्त्व आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगला खेळ निवडून त्यात पुढे जाण्याची गरज आहे." प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य काकासाहेब भोसले यांनी आभार मानले. डॉ. तेजस चव्हाण, डॉ. अश्विनी तातुगडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास नागराळेच्या सरपंच वनिता पाटील, धैर्यशील पाटील, दादासो पाटील, कार्याध्यक्ष डॉ. टी. एस. भोसले, लेफ्टनंट संदेश दांडे, प्रा. अमोल जमदाडे उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA
LIBRARY

लोकमत दिनांक 02/06/2022



रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात आमदार अरुण लाड यांनी मार्गदर्शन केले.

# विद्यार्थ्यांनो, जीवनात दैववादी होऊ नका, तर ध्येयवादी बना

## अरुण लाड : रामानंदनगरमध्ये कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पलूस :** बहुजन समाजातील तरुणांनी शिक्षणाकडे लक्ष द्यावे. त्यांनी दैववादी न होता ध्येयवादी व्हावे, असे प्रतिपादन आमदार अरुण लाड यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. आ. लाड म्हणाले, विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षणात क्रीडा व कला विषयांना महत्त्व देण्याची गरज आहे.

कथाकथनकार [illegible] म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांशिवाय दुसरा आदर्श नाही. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत घराइतकेच योगदान शिक्षण संस्थांचे असते. महेंद्रआप्पा लाड म्हणाले, विद्यार्थ्यांना ऊर्जा व दिशा देण्याचे काम महाविद्यालये करत आहेत.

प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागराळेचे सरपंच वनिता पाटील, धैर्यशील पाटील, डॉ. टी. एस. भोसले, लेफ्टनंट संदेश दौंडे, प्रा. अमोल जमदाडे आदी उपस्थित होते.

Hello Sangli
Page No. 3 Jun 02, 2022
Powered by: erelego.com

आर्ट्स सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज ग्रंथालय रामानंदनगर (बुर्ली)
DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY (BURLI)

पुढारी

दिनांक 02/06/2022

## संक्षिप्त



रामानंदनगर : येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात बोलताना आमदार अरूण लाड.

# विद्यार्थ्यांनी ध्येयवादी व्हावे : आ. लाड

**पलूस :** बहुजन समाजातील तरूणांनी शिक्षणाकडे लक्ष द्यावे. त्यांनी दैववादी न होता ध्येयवादी व्हावे. देशातील धार्मिकदृष्ट्या दुर्लक्ष करून सहिष्णूवृत्तीने वागावे. काळाच्या कसोटीवर विद्यार्थी टिकेल, असे जीवनावश्यक ज्ञान देण्यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्न करावेत, असे मत आमदार अरूणअण्णा लाड यांनी व्यक्त केले. ते रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये बोलत होते. यावेळी कथाकथनकार जयवंत आवटे यांचे कथाकथन झाले. यावेळी महेंद्र लाड म्हणाले, विद्यार्थ्यांना ऊर्जा व दिशा देण्याचे काम महाविद्यालये करत असतात. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी प्रास्ताविक केले. यावेळी वनीता पाटील, धैर्यशील पाटील, दादासो पाटील, कार्याध्यक्ष डॉ. टी. एस. भोसले, लेफ्टनंट संदेश दौंडे, प्रा. अमोल जमदाडे उपस्थित होते.

आर्ट्स सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

पुढारी

25/05/2022



पलूस : रामानंदनगर येथे क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना जे. के. बापू जाधव.

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धा उत्साहात

पलूस : पुढारी वृत्तसेवा

रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. स्पर्धांचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे. के. बापू जाधव यांच्याहस्ते झाले. यावेळी उपप्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, डॉ. के. बी. भोसले उपस्थित होते. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संदेश दौंडे यांनी स्पर्धेचे संयोजन केले. तेजस चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. दिलीप कोणे यांनी आभार मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA LIBRARY

My Sangli Edition
May 25, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

सकाळ » TODAY

गुरुवार, २६ मे २०२२ ४

# आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करा : जाधव

किर्लोस्करवाडी, ता. २५ : "विद्यालयीन जीवनात शालेय क्रीडा स्पर्धेत खेळल्यामुळे शारीरिक विकास साधला जातो. विविध गुण आत्मसात होत असतात. वार्षिक क्रीडा प्रकारामुळे विद्यार्थ्यांना आपली कौशल्ये दाखवण्यास वाव मिळत असतो. मात्र महाविद्यालयाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू या महाविद्यालयातील तयार व्हावेत असे प्रयत्न करावेत," असे मत जे. के. जाधव यांनी व्यक्त केले.



रामानंदनगरः येथे स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना जे. के. जाधव. सोबत प्राचार्य व कर्मचारी.

रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगरमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात झाल्या. स्पर्धेसाठी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे. के. जाधव उद्घाटनप्रसंगी उपस्थित होते, त्यावेळी ते बोलत होते. "रामानंदनगर महाविद्यालयाचा नावलौकिक खूप मोठा आहे. कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात यश मिळवलेल्या महाविद्यालयाने यशाची मोठी उंची गाठली आहे, यात शंका नाही, त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे आरोग्य जपणे खूप महत्त्वाचे आहे," हे त्यांनी सांगितले. जिमखाना विभागप्रमुख प्रा. संदेश दौंडे यांनी क्रीडा स्पर्धेचे संयोजन केले. स्पर्धेमध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, कॅरम, बुद्धिबळ आदी स्पर्धा होणार आहेत. उद्घाटनप्रसंगी उपप्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, डॉ. के. बी. भोसले उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ
सांगली परिसर
मंगळवार, १७ मे २०२२
२



किर्लोस्करवाडी : रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात मशरूम शेती प्रशिक्षणामध्ये सहभागी विद्यार्थी.

# रामानंदनगरला मशरूम शेती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण

**किर्लोस्करवाडी, ता. १६ :** रामानंदनगर येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात मशरूम शेती प्रशिक्षण झाले. प्रशिक्षण तीन दिवसांचे होते.

मशरूम शेती कशी करावी, मशरूमचे औषधी उपयोग, मशरूम व्यवसाय कसा करावा, कमी जागेत जास्त उत्पन्न कसे मिळवावे, याविषयी माहिती देण्यात आली.

प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना फायदा होण्यासाठी प्रथमच अशा प्रकारचे प्रशिक्षण राबवण्यात आले. त्याचा विद्यार्थ्यांना लाभ झाला.

वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. स्नेहा वाघ, प्रा. वैशाली शिंदे यांनी आयोजन केले. प्रियांका फूड्स अँड नॅचरल्स (कडोली) येथील दिग्विजय पाटील, शुभम, संकेत यांनी मार्गदर्शन केले. पलूस कॉलेज व महाविद्यालयाचे ५० विद्यार्थी सहभागी झाले. उपप्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, ए. सी. एस. कॉलेजचे (पलूस) डॉ. शेंडगे, प्रा. दिलीप कोळी व विद्यार्थी उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

पुढारी दिनांक - 16/5/2022

पुढारी




रामानंदनगर : येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात मशरूम शेती प्रशिक्षण घेताना विद्यार्थी.

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात मशरूम शेती प्रशिक्षण

पलूस : पुढारी वृत्तसेवा

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथे मशरूम शेती प्रशिक्षण यशस्वीरित्या झाले.

मशरूम शेती कशी करावी, मशरूमचे औषधी उपयोग, मशरूम व्यवसाय कसा करावा, कमी जागेमध्ये जास्त उत्पन्न कसे मिळवावे तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व या भागातील शेतकऱ्यांना याचा फायदा होण्यासाठी प्रथमच अशा प्रकारचे प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात आल्याने याचा लाभ विद्यार्थ्यांना झाला. वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख प्रा. स्नेहा वाघ, प्रा. वैशाली शिंदे यांनी प्रशिक्षणाचे आयोजन केले.

दिग्विजय पाटील यांनी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, डॉ. शेंडगे, प्रा. दिलीप कोणे उपस्थित होते.

Sangli Edition
May 16, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

केसरी दि. 06/05/2022

# राजर्षी शाहू महाराजांनी धोरणात्मक निर्णय घेतले

व्ही. आर. माने
केसरी वृत्तसेवा

**कुंडल** : क्रांती अग्रणी महाविद्यालयाचे डॉ. व्ही. आर. माने राजर्षी शाहू महाराज हे राज्यकारभारात प्रयोग करणारे राजे होते त्यामुळे त्यांनी धोरणात्मक व कार्यात्मक निर्णय आपल्या संस्थानामध्ये घेतले, असे मत क्रांती अग्रणी महाविद्यालयाचे डॉ. व्ही. आर. माने यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथे राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी निमित्त व्याख्यान झाले. यावेळी डॉ. माने म्हणाले, दीनदलितांना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी शाळांची उभारणी केली. त्याचबरोबर बहुजन समाजातील तरुणांना शिकता यावे, यासाठी वसतिगृहांची निर्मिती देखील करण्यास राजश्री शाहूंनी प्रेरणा दिली. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे, जनरल बॉडी सदस्य जे. के.जाधव होते. ते म्हणाले राजर्षी शाहूंची दूरदृष्टी होती, यामुळे त्यांनी कोणत्याही लोकांना त्रास न देता राधानगरीचे मोठे धरण बांधले. यावेळी डॉ. एल. डी. कदम उपस्थित होते. महाविद्यालयांमध्ये राजश्री शाहूंच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. प्रा दिलीप कोणे, प्रा.डॉ. तेजस चव्हाण, स्वाती मगदूम, डॉ. आर. आर. सोनावले, उपप्राचार्य डॉ. टी. एस.भोसले, डॉ. के. बी. भोसले उपस्थित होते. आभार स्वाती मगदूम यांनी मानले.



रामानंदनगर : राजश्री शाहूं महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून स्तब्धता पाळून आदरांजली वाहण्यात आली.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

दैनिक ललकार दिनांक २८/०४/२०२२

# युवा उर्जा मेळाव्यातून ग्रामीण तरूणाईला उद्योगाभिमुख शिक्षण

## डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात उपक्रम

। ललकार वृत्त ।

कुंडल दि. २८ (वार्ताहर)- रयत शिक्षण संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना युवा उर्जा मेळाव्यातून व्यवसाय,उद्योग उभारताना येणाऱ्या अडचणींची जाणीव जागृती करून देत त्यावरील उपययोजनांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.असे प्रतिपादन उद्घाटक प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे यांनी केले. ते रामानंदनगर येथील डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये आयोजित युवा उर्जा मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे व जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड,सदस्य जे.के.जाधव,यांच्यासह प्राचार्य डॉ.एल.डी.कदम, उपप्राचार्य डॉ.काकासाहेब भोसलेडॉ. टी. एस.भोसले,ग्रंथालय प्रमुख डॉ.नमिता पाटील यांच्यासह प्राध्यापक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शोध,नावीन्य,स्टार्ट अप या संकल्पना विद्यार्थ्यांना समजाव्या त्याचे प्रात्यक्षिक घेऊन मुलांना व्यावसायाभिमुख करण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजित करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांमधील कलागुणांना व सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्यामध्ये सर्व विभागांच्या वतीने विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध साधने, खाद्यपदार्थ,पोस्टर,तसेच दुर्मिळ वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले.



DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA LIBRARY

दैनिक प्रभात दिनांक - २७/०४/२०२२

# रामानंदनगर येथे फिजिकल फिटनेस विषयावर कार्यशाळा संपन्न



**पलुस : हॅलो प्रभात**

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,रामानंदनगर येथे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत व जिमखाना विभाग,एनसीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'सर्व विद्यार्थ्यांसाठी फिजिकल फिटनेस' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.

पलूस येथील रॉयल जिमचे संस्थापक अध्यक्ष व आहार तज्ञ किरण निकम हे मार्गदर्शनासाठी उपस्थित होते. यावेळी लेडीज फिटनेस ट्रेनर अर्चना निकम यांनी महिलांसाठी योग्य आहार व योग्य व्यायाम करणे खूप महत्त्वाचे आहे असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे संयोजन शारीरिक शिक्षण संचालक, लेफ्टनंट संदेश दौंडे, जिमखाना विभाग, एनसीसी विभाग यांनी संयुक्तरीत्या केले.

कार्यक्रमासाठी सांगली जिल्हा क्रीडा परिषदेचे सचिव डॉ.महेश पाटील, प्रा. विश्वास सावंत, प्रा. शीला मोहिते, प्रा. अक्रम मुजावर, प्रा. वटकर उपस्थित होते. नऊ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला.

कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ.के.बी. भोसले,डॉ.टी. एस. भोसले प्रा .अमोल जमदाडे, डॉ अश्विनी तातुगडे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

पुढारी
MY सांगली
मंगळवार, १९ एप्रिल २०२२

# एन. डी. पाटील बहुजनांसाठी ठाम राहिले

## प्राचार्य विश्वास सायनाकर : रामानंदनगर येथे व्याख्यान

**प्लूस : पुढारी वृत्तसेवा**

बहुजनांच्या अडचणीत काळात ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे ठाम राहिले होते, असे मत प्राचार्य विश्वास सायनाकर यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगरमध्ये एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ते बोलत होते.



रामानंदनगर : येथे प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना अभिवादन करताना जे. के. जाधव, प्राचार्य विश्वास सायनाकर आदी.

ते म्हणाले, एन. डी. पाटील म्हणत होते की, मी चळवळीचा कार्यकर्ता आहे, आपणास खरेदी करणारा जन्माला यायचा आहे, अशी त्यांची भूमिका होती. सन १९७२ मध्ये दुष्काळी परिस्थितीत एन. डी. पाटील यांनी इस्लामपूर तहसील कचेरीवर काढलेला मोर्चा गाजला. त्यांना पोलिसांनी मारहाण केली. पोलिसांच्या गोळीबारात चार बळी गेले होते.

अध्यक्षस्थानावरुन कृष्णाकाठ उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष जे. के. जाधव यांनी सांगितले, कुणावरही अन्याय होवो प्रत्येक ठिकाणी संघर्ष करून अन्यायग्रस्तांशी लढण्याची भूमिका एन. डी. पाटील यांची होती.

महाविद्यालयांमध्ये प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्यावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येणार आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी सांगितले. ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. पाटील, क्रांतिकुमार जाधव उपस्थित होते.

## सहा वर्षांच्या चिमुकलीने केला कडकडीत रोजा

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**



चिंतामण नगर येथे रामरहिम कॉलनीतील बरीरा इरफान मुजावर या सहा वर्षांच्या चिमुकलीने रमजानचा मोठा मानला जात असलेला १५ वा रोझा केला. याचे भागातील बांधवांनी कौतुक केले. अनेकांनी खाऊ, मिठाई देऊन बरीरास शुभेच्छा दिल्या.

## जिल्ह्यात ढगाळ वातावरण

**सांगली :** सांगली जिल्ह्यात आज सलग दुसऱ्या तिसऱ्या दिवशी दिवसभर ढगाळ वातावरण होते. तसेच अनेक ठिकाणी उष्मा कायम होता. प्रामुख्याने पश्चिम भागातील शिराळा, वाळवा तालुक्यात पावसाचे चिन्ह होते. मात्र पाऊस झाला नाही.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

दैनिक पुढारी दिनांक १९।४।२०२२

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANAND[illegible] (BURLI)

पुढारी

# एन. डी. पाटील बहुजनांसाठी ठाम राहिले

## प्राचार्य विश्वास सायनाकर : रामानंदनगर येथे व्याख्यान



रामानंदनगर : येथे प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना अभिवादन करताना जे. के. जाधव, प्राचार्य विश्वास सायनाकर आदी.

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

बहुजनांच्या अडचणीत काळात ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे ठाम राहिले होते, असे मत प्राचार्य विश्वास सायनाकर यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगरमध्ये एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले, एन. डी. पाटील म्हणत होते की, मी चळवळीचा कार्यकर्ता आहे, आपणास खरेदी करणारा जन्माला यायचा आहे, अशी त्यांची भूमिका होती. सन १९७२ मध्ये दुष्काळी परिस्थितीत एन. डी. पाटील यांनी इस्लामपूर तहसील कचेरीवर काढलेला मोर्चा गाजला. त्यांना पोलिसांनी मारहाण केली. पोलिसांच्या गोळीबारात चार बळी गेले होते.

अध्यक्षस्थानावरुन कृष्णाकाठ उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष जे. के. जाधव यांनी सांगितले, कुणावरही अन्याय होवो प्रत्येक ठिकाणी संघर्ष करून अन्यायग्रस्तांशी लढण्याची भूमिका एन. डी. पाटील यांची होती. महाविद्यालयांमध्ये प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्यावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येणार आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी सांगितले. ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. पाटील, क्रांतिकुमार जाधव उपस्थित होते.

My Sangli Edition
Apr 19, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

दैनिक पुढारी दिनांक ११/०४/२०२२

पुढारी

# उत्पन्न क्षमता वाढविण्यासाठी सूक्ष्मनियोजन आवश्यक

## चेतन नरके : रामानंदनगर येथे 'शेतमाल विपणनाची सद्यस्थिती' कार्यशाळा

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय कृषी धोरणे ही शेतीपूरक असली तरी बहुतेक शेतकरी याबाबत अनभिज्ञ आहेत. तेव्हा शेतकऱ्यांनी याबाबत माहिती घेऊन शेतीमध्ये उत्पादने घ्यावीत. आजच्या काळात शेतकऱ्यांनी हवामानाबद्दल सजग होऊन पीक व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. शेतीत चांगले पीक पिकवणे, हे यशस्वी शेतीचे सूत्र राहिलेले नसून पिकवलेला माल कुठे विकायचा, याचे ज्ञान असणे गरजेचे आहे, असे मत चेतन नरके यांनी मांडले.

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथे 'भारतातील शेतमाल विपणनाची सद्यस्थिती' या विषयाच्या राष्ट्रीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कृष्णाकाठ उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष जे. के. (बापू) जाधव होते.



**रामानंदनगर : येथील शेतमाल राष्ट्रीय कार्यशाळेत बोलताना चेतन नरके. बाजूस जे. के. जाधव.**

चेतन नरके म्हणाले, भारतीय शेतकऱ्यांनी बाजारपेठ पाहून मगच पिकाचे उत्पन्न घ्यावे. शेतकऱ्यांनी मार्केटिंग समजून घेतले तरच शेतकरी उद्याच्या जगात टिकू शकेल.

जे. के बापू जाधव म्हणाले, आपला शेतकरी अलीकडच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती कसत आहे. परंतु, वातावरण व निसर्गात अचानक होणाऱ्या बदलल्यामुळे त्याला मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. तेव्हा शेतकऱ्यांनी हवामानाबद्दल साक्षर होणे काळाची गरज आहे.

प्रा. प्रतिभा पुदाले यांनी स्वागत तर डॉ. अश्विनी तातुगडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सागर कुंडले यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, क्रांतिकुमार जाधव, राजाराम राडे, पुणदीचे सरपंच संपत पाटील, प्रमोद जाधव, सागर लुपणे, अशोक पोतदार, शेतकरी उपस्थित होते.

## जय जवान नागरी सहकारी पतसंस्थेला ६३ लाखांचा नफा



My Sangli Edition
Apr 11, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

दैनिक सकाळ
११ एप्रिल २०२२

दैनिक सकाळ दि ११/०४/२०२२

# हवामानाबद्दल सजग होणे गरजेचे

## डॉ. चेतन नरके : रामानंदनगर येथे कार्यशाळा, पिकांचे व्यवस्थापन करा

**सकाळ वृत्तसेवा**

किर्लोस्करवाडी ता. १० : भारतीय कृषिधोरणे ही शेतीपूरक असली तरी बहुतेक शेतकरी याबाबत अनभिज्ञ आहेत. तेव्हा शेतकऱ्यांनी याबाबत माहिती घेऊन शेतीमध्ये उत्पादने घ्यावीत. आजच्या काळात शेतकऱ्यांनी हवामानाबद्दल सजग होऊन पीक व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. असे मत डॉ .चेतन नरके यांनी मांडले.

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथे 'भारतातील शेतमाल विपणनाची सद्यस्थिती' या विषयाच्या राष्ट्रीय कार्यशाळेत ते बोलत होते. चेतन नरके हे थायलंड सरकारचे वाणिज्य सल्लागार आहेत. ते म्हणाले, 'भारतीय शेतकऱ्यांनी बाजारपेठ पाहून मगच पिकाचे उत्पन्न घ्यावीत. शेतकऱ्यांनी मार्केटिंग समजून घेतले पाहिजे व पॅकिंग पद्धत चांगली व आकर्षक असेल तर उत्पादन विकण्यास मदत होईल. शेतकरी उद्याच्या जगात टिकू शकेल. शेतकऱ्याने स्वतः ला मदत करायला शिका तरच शेती फायद्यात येईल शेतकऱ्याने व व्यवसाय धारकाने अर्थव्यवस्थेतील ताळेबंद महत्त्वाचा आहे तो शिकायला हवा. जे. के. जाधव म्हणाले, ''आपला शेतकरी अलीकडच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती कसत आहे. परंतु वातावरण व निसर्गात अचानक होणाऱ्या बदलल्यामुळे त्याला मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. तेव्हा शेतकऱ्यांनी हवामानाबद्दल साक्षर होणे काळाची गरज आहे. "महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेची भूमिका प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी मांडली. यावेळी क्रांतिकुमार जाधव, राजाराम राडे, सरपंच संपत पाटील, प्रमोद जाधव, सागर लुपणे, सुरेश चव्हाण, संजय जाधव, दिनकर आरबुने, श्रीकांत कदम, संदीप पाटील, तानाजी चव्हाण, भीमराव नलवडे उपस्थित होते.



**रामानंदनगर : येथे राष्ट्रीय कार्यशाळेत बोलताना डॉ. चेतन नरके, व्यासपीठावर जे. के. बापू जाधव, प्राचार्य डॉ. एल. डी. कदम आदी.**

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHYALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ | सांगली
सांगली, गुरुवार, २१ एप्रिल २०२२
TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800



रामानंदनगर : प्रा. एन. डी. पाटील यांच्या स्मृतीनिमित्त कार्यक्रमास उपस्थित जे. के. बापू जाधव, विश्वास सायनर, तुकाराम धायगुडे, क्रांतीकुमार जाधव आदी.

# अडचणीच्या वेळी होते एन. डी. पाटील बहुजन समाजाच्या पाठीशी : सायनाकर

किर्लोस्करवाडी, ता. २० : रयत शिक्षण संस्थेच्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये प्रा. एन. डी. पाटील यांच्या स्मृती प्रीत्यर्थ व्याख्यानमाला झाली. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालया माजी प्राचार्य विश्वास सायनाकर म्हणाले, ''बहुजन समाजाला ज्या ज्या वेळी अडचणी आल्या त्या त्या वेळी एन. डी. पाटील त्यांच्या पाठीशी उभे राहिले. चळवळीतला कार्यकर्ता विकला जात नाही. मी चळवळीचा कार्यकर्ता मला खरेदी करणारा जन्माला यायचा आहे. अशी त्यांची ठाम भूमिका होती. १९७२ साली दुष्काळी परिस्थितीत एन. डी सरांनी कचेरीवर काढलेला मोर्चा गाजला. त्यामध्ये त्याना एसआरपीने त्यांना मारहाण केली, अटक केली. पोलिसांच्या गोळीबारात चार बळी गेले. मग त्यांना सोडले.''

कार्यक्रमाचे अध्यक्ष जे. के. (बापू) जाधव म्हणाले, ''कुठल्याही क्षेत्रात कुणावरही अन्याय होवो प्रत्येक ठिकाणी संघर्ष करून अन्यायग्रस्तांशी लढण्याची भूमिका एन. डी. पाटील यांची होती.'' महाविद्यालयामध्ये प्रत्येक १७ तारखेला प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्यावर व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात येणार आहे, असे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. (आबा) पाटील, क्रांतीकुमार जाधव उपस्थित होते. संयोजन प्रा. दिलीप कोणे, प्रा. स्वाती मगदूम यांनी केले. सूत्रसंचालन प्रा स्वाती मगदूम, आभार प्रा. डॉ. शीतल पाटील यांनी मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY RAMANANDNAGAR (BURLI)
DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY RAMANANDNAGAR (BURLI)

पुढारी

संक्षिप्त

16/03/2022

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात पहिली आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात

**पलूस :** रयत शिक्षण संस्थेच्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, प्राणीशास्त्र व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष या विभागांच्या संयुक्त विद्यमाने पहिली आंतरराष्ट्रीय परिषद झाली. 'अॅडव्हान्स इन मटेरियल सायन्स अँड अॅप्लाईड बायोलॉजी' असा विषय होता. या परिषदेमध्ये तुर्कस्थान, अमेरिका, दक्षिण कोरिया, स्वीडन या देशातून तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. तसेच देशभरातून पाचशेहून अधिक संशोधक सहभागी झाले होते. परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. उद्घाटन सत्राचे बिजभाषण प्रा. डॉ. अब्दुल रहेमान (जॉर्डन), यांनी केले. संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. पी. बी. पिस्टे (रसायनशास्त्र), प्रा. डॉ. गौरी पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. अभिजित माने (प्राणिशास्त्र) यांनी केले. प्रा. प्रियंका घोरपडे व डॉ. अश्विनी तातुगडे यांनी सूत्रसंचालन, प्रा. स्नेहा वाघ यांनी आभार मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA … NAGAR (BURLI) LIBRARY

दै. सकाळ दि. १५/०३/२०२२

# नेहरूंची चिकित्सा करा, द्वेष नको

## श्रीराम पवार : पंडितजींच्या शेती धोरणावर रामानंदनगर येथे राष्ट्रीय चर्चासत्र

किर्लोस्करवाडी, ता. १४ : उपासमारीने ग्रस्त ते शेतमालाच्या निर्यातदार या स्वतंत्र भारताच्या वाटचालीचे श्रेय पंडित नेहरू यांचे आहे. त्यांच्या योगदानाची दखल न घेता पुढे जाता येणार नाही. नेहरूंची चिकित्सा करा द्वेष नको, असे मत सकाळ माध्यम समूहाचे संपादक-संचालक श्रीराम पवार यांनी व्यक्त केले. रामानंदनगर (ता. पलूस) येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. राज्यशास्त्र विभाग व शिवाजी विद्यापीठाने चर्चासत्राचे आयोजन केले होते. 'पंडित नेहरू यांचे कृषी धोरण व समकालीन प्रासंगिकता' या विषयावरील चर्चासत्राचे बीजभाषण त्यांनी केले. जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

श्री. पवार म्हणाले, "... पिढीला पंडितजींच्या ... माहिती असणे ... सामान्यांचा विकास या धोरणाच्या केंद्रस्थानी आहे. त्यांनी नियोजन आयोग सुरू केला. शेतीकडे डोळसपणे पाहिले. त्यांच्या दहा वर्षांतच शेती विकासाला गती मिळाली. आजचा भारत समजून घ्यायचा तर तेव्हाचा ... समजून घेतला पाहिजे. ... पूर्वीची दोन दशके भारतात ... टंचाई होती. शेतीवरील लोकसंख्येचे अवलंबित्व मोठे होते. आज चित्र बदलले. त्यामागे नेहरूंची धोरणे आहेत. आज देशात दोन वर्षे पुरेल इतका धान्य साठा शिल्लक असतो. सिंचनाला बळ, सहकारी पतपुरवठ्याला प्रोत्साहन यातूनच हरित क्रांतीचा पाया घातला गेला."



रामानंदनगर : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात सोमवारी राष्ट्रीय चर्चासत्र झाले. उद्घाटन सत्रात प्रतिमा पूजन प्रसंगी उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले, जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड, प्रा. डॉ. रवींद्र भणगे, 'सकाळ'चे संपादक संचालक श्रीराम पवार, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. टी. एस. भोसले, नाथाकाका पाटील आदी.

प्रथम सत्रात शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे डॉ. प्रकाश पवार यांचे 'भारत एक संकल्पना आणि कृषी धोरण' या विषयावर भाषण झाले. जो शेती धोरण योग्य पद्धतीने राबवतो व घटनेचे योग्य पालन करतो तो देशभक्त अशी स्पष्ट व्याख्या पंडितजींनी केली होती. शेतीला देशभक्तीशी जोडण्याची त्यांची दृष्टी त्यांचे प्राधान्यक्रम दाखवतात, असे ते म्हणाले.

दुसऱ्या सत्रात 'पंडित नेहरूंच्या विचारांची समकालीन प्रासंगिकता' या विषयावर बोलताना नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे यांनी पंडितजींनी स्वीकारलेली पंचशील तत्त्व आणि अलिप्ततावादाचे धोरण जगभरातील विकसनशील देशांसाठी दिशादर्शक ठरले. आजच्या युद्धस्थितीत याच धोरणांचा अंगीकार करीत आहेत, असे सांगितले. अध्यक्षीय समारोप प्रा. सिकंदर जमादार यांनी केला. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, डॉ. सचिन चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन झाले. माजी उपसभापती राजेश खारगे, प्रशांत नलवडे, नाथा काका पाटील, प्रा. सुखदेव उदरे, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, डॉ. टी. एस. भोसले, शीतल पाटील उपस्थित होते. डॉ. तेजस चव्हाण, स्वाती मगदूम, डॉ. अश्विनी तावरगडे यांनी सूत्रसंचालन केले.

### काश्मीर आणि नेहरू...

श्री. पवार म्हणाले, "नेहरूंच्या धोरणाची चिकित्सा जरूर व्हावी, मात्र द्वेषमूलक नजरेतून होता कामा नये. हा लोकशाहीवादी नेता आजच्या काळातही प्रासंगिक आहे हे पदोपदी दिसून येते. विरोधकांची टीका ऐकण्याची क्षमता त्यांच्याकडे होती. संसदेला ते नेहमी सामोरे गेले. आज चीनच्या घुसखोरीवरचे सरकारचे मौन पाहता नेहरूंचे मोठेपण लक्षात येते. आज घुसखोरीची माहिती दडवून ठेवली जाते. काश्मीरबाबतही नेहरूंवर चिखलफेक होते. मात्र काश्मीर भारतात आहे ते त्यांच्या तो केवळ नेहरूंमुळेच.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

Sangli Main
15/3/2022

पुढारी
MY सांगली
बुधवार, १६ मार्च २०२२

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

# कृषी विकासात पंडित नेहरूंचे योगदान मोलाचे

## रामानंदनगर येथे 'पंडित नेहरूंच्या कृषी धोरणाबद्दल चर्चासत्र

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

देशाच्या कृषी विकासामध्ये पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांचे विचार समाजापर्यंत पोचविणे गरजेचे आहे, असे मत सांगली जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभाग आणि नेहरू अभ्यास केंद्र (शिवाजी विद्यापीठ) यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंडित नेहरू यांचे कृषी धोरण व समकालीन प्रासंगिकता' या विषयावर एक दिवसाचे चर्चासत्र झाले. त्यावेळी लाड बोलत होते.



पलूस : रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात चर्चासत्राच्या उद्‍घाटनप्रसंगी बोलताना सांगली जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड.

पहिल्या सत्रात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट विभागाचे संचालक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांचे 'भारत एक संकल्पना आणि कृषी धोरण' या विषयावर भाषण झाले. 'पंडित नेहरूंच्या विचारांची समकालीन प्रासंगिकता' यावर नेहरू अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांचे भाषण झाले.

सिकंदर जमादार, राजेश खारगे, प्रशांत नलवडे, नाथा पाटील, प्रा. सुखदेव उदरे, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, डॉ. टी. एस. भोसले उपस्थित होते. डॉ. तेजस चव्हाण, प्रा. स्वाती मगदूम, डॉ. अश्विनी तातुगडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. सचिन चव्हाण यांनी संयोजन केले.

KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ | सांगली

सांगली, रविवार, १३ मार्च २०२२

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

# पंडित नेहरुंच्या कृषी धोरणावर उद्या रामानंदनगरात चर्चासत्र

## श्रीराम पवार, डॉ. प्रकाश पवार प्रमुख वक्ते

किर्लोस्करवाडी, ता.१२ : रामानंदनगर येथे रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात उद्या (ता.१४) 'पंडित नेहरू यांचे कृषी धोरण व समकालीन प्रासंगिकता' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होत आहे. सकाळी दहा वाजता चर्चासत्राचे उद्घाटन सकाळ माध्यमसमूहाचे मुख्य संपादक व संचालक श्रीराम पवार यांच्या बीजभाषणाने होणार आहे. या सत्रात शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. प्रकाश पवार यांचे 'भारत एक संकल्पना आणि कृषिधोरण' या विषयावर भाषण होईल. दुसऱ्या सत्रात 'नेहरूंच्या विचारांची समकालीन प्रासंगिकता' या विषयावर प्रा. डॉ. रवींद्र भणगे बोलतील. चर्चासत्रासाठी जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड, जिल्हा बँकेचे माजी संचालक सिकंदर जमादार, महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सचिन चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती आहे. चर्चासत्र सर्वांसाठी खुले आहे. त्याचा लाभ सर्व क्षेत्रांतील कार्यकर्ते-जाणकारांनी घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी केले आहे.

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आज 'कृषी धोरण'वर राष्ट्रीय चर्चासत्र

**पलूस** : रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात 'पंडित नेहरू यांचे कृषी धोरण व समकालीन प्रासंगिकता' या विषयावर आज सोमवार, दि. १४ मार्चरोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक महेंद्र लाड माजी संचालक सिकंदर जमादार यांच्याहस्ते होणार आहे. पहिले सत्रात 'भारत एक संकल्पना आणि कृषिधोरण' यावर प्रा. डॉ. प्रकाश पवार यांचे मार्गदर्शन होणार आहे. दुसऱ्या सत्रात 'पंडित नेहरूंच्या विचारांची समकालीन प्रासंगिकता' यावर प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांचे व्याख्यान होणार आहे. प्रा. डॉ. सचिन चव्हाण यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या चर्चासत्रासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी केले आहे.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY RAMANANDNAGAR (BURLI)

## संक्षिप्त



रामानंदनगर : येथे व्याख्यानात बोलताना मेजर आर. एस. डुबल.

# सातत्यपूर्ण नियोजन केल्यास सैन्यदलात संधी शक्य : डुबल

**पलूस :** नियमित सातत्यपूर्ण नियोजन केल्यास सैन्यदलात भरती होणे शक्य आहे, असे प्रतिपादन छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूरचे प्रभारी प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल यांनी केले. रामानंदनगर, बुर्ली येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आयोजित 'सैन्य दलातील संधी' या विषयावर व्याख्यानात बोलत होते. ते पुढे म्हणाले, सध्या सैन्यदलात भरती होण्यासाठी व देश सेवा करण्यासाठी खूप विद्यार्थी प्रयत्न करत आहेत. अनेक विद्यार्थी नियमित भरतीचा सराव करत असतात. त्यांनी नियोजन करून भरतीत उतरावे. यश निश्चित मिळेल. यावेळी सुभेदार नानासाहेब यादव, प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, उपप्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले उपस्थित होते. संदेश दौंडे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. सचिन चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.नितीन कुंभार यांनी आभार मानले.

सकाळ TODAY
बुधवार, २ फेब्रुवारी २०२२

# आंतरराष्ट्रीय परिषदेस रामानंदनगर येथे प्रतिसाद

सकाळ वृत्तसेवा

किर्लोस्करवाडी, ता. १ : रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) येथे महाविद्यालयातील रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, प्राणिशास्त्र व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष या विभागाच्या संयुक्त विद्यमाने पहिली आंतरराष्ट्रीय परिषद 'ॲडव्हान्स इन मटेरियल सायन्स ॲण्ड अप्लाईड बायोलॉजी-२०२२' (ICAMSAB-2022) या विषयावर पार पडली. या आंतरराष्ट्रीय परिषदेत जगभरातून तुर्की, अमेरिका, दक्षिण कोरिया, स्वीडन या देशातून तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित राहिले, तसेच या परिषदेसाठी सबंध देशभरातून ५०० हून अधिक संशोधक सहभागी झाले. परिषदेचे उद्घाटन प्र-कुलगुरू शिवाजी विद्यापीठ प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. बिजभाषक प्रा. डॉ. अब्देल रहेमान (जॉर्डन) यांनी केले. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. पी. बी. पिस्टे (रसायनशास्त्र), प्रा. डॉ. गौरी पाटील, प्रा. अभिजीत माने यांनी केले. प्रा. प्रियंका घोरपडे व डॉ. अश्विनी तातुगडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. स्नेहा वाघ यांनी आभार मानले. प्रा. दिनेश ससाणे यांनी तंत्रसहाय्य केले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

आर्टस् सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

संक्षिप्त

## डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात पहिली आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात

**पलूस :** रयत शिक्षण संस्थेच्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, प्राणीशास्त्र व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष या विभागांच्या संयुक्त विद्यमाने पहिली आंतरराष्ट्रीय परिषद झाली. 'ॲडव्हान्स इन मटेरियल सायन्स ॲंड ॲप्लाईड बायोलॉजी' असा विषय होता. या परिषदेमध्ये तुर्कस्थान, अमेरिका, दक्षिण कोरिया, स्वीडन या देशातून तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. तसेच देशभरातून पाचशेहून अधिक संशोधक सहभागी झाले होते. परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. उद्घाटन सत्राचे बिजभाषण प्रा. डॉ. अब्दुल रहेमान (जॉर्डन), यांनी केले. संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. पी. बी. पिस्टे (रसायनशास्त्र), प्रा. डॉ. गौरी पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. अभिजित माने (प्राणिशास्त्र) यांनी केले. प्रा. प्रियंका घोरपडे व डॉ. अश्विनी तातुगडे यांनी सूत्रसंचालन, प्रा. स्नेहा वाघ यांनी आभार मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ | सांगली
सांगली, शनिवार, २२ जानेवारी २०२२

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHYALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

# रामानंदनगर महाविद्यालय येथे २७ ला आंतरराष्ट्रीय परिषद

किर्लोस्करवाडी, ता. २१ : रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली) येथे २७ व २८ जानेवारी रोजी महाविद्यालयातील रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, प्राणिशास्त्र व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष या विभागाच्या संयुक्त विद्यमाने पहिली आंतरराष्ट्रीय परिषद Advances in material science and applied biology (ICAMSAB-2022) या विषयावर आयोजित केली आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये जगभरातून टर्की, अमेरिका, दक्षिण कोरिया, स्वीडन या देशांतून तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित राहणार आहेत. परिषदेचे उद्घाटन प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ प्रा. डॉ. पी. एस. पाटील हे करणार आहेत तसेच या सत्राचे बिजभाषक प्रो. डॉ. अब्देल रहेमान (जॉर्डन) हे आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रो. डॉ. पी. बी. पिस्टे (रसायनशास्त्र), प्रा. डॉ. गौरी पाटील, पदार्थविज्ञान प्रा. अभिजित माने प्राणिशास्त्र हे करत आहेत.

सकाळ
सोमवार, २१ मार्च २०२२

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

# कदम महाविद्यालयात व्याख्यानास प्रतिसाद

किर्लोस्करवाडी, ता. २० : बाजारात वस्तू व सेवांची खरेदी करताना ग्राहकांनी हक्काची जाणीव ठेवावी. तो त्यांचा कायदेशीर, अधिकार आहे. खरेदी केलेल्या वस्तूंचे बिल मागून घेणे, पारख करूनच वस्तूंची खरेदी करणे, वस्तूची खरेदी करताना आमिषाला बळी पडू नये, तसेच अपवादात्मक परिस्थतीत फसवणूक झाल्यास जिल्हा ग्राहक न्यायालयात दाद मागावी, असे प्रतिपादन डॉ. एम. ए. कोरे यांनी केले. रामानंदनगर (बुर्ली) येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागामार्फत जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त 'ग्राहकांचे हक्क' या व्याख्यानात ते बोलत होते. ग्राहकाला हक्काची जाणीव, तो सक्षम होण्यासाठी स्पर्धात्मक जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले अध्यक्षस्थानी होते. डॉ. अमोल कांबळे, प्रा. सागर कुंडले, प्रा. शुभांगी लवटे यांनी नियोजन केले.

# तरुण मतदार हाच देशाच्या लोकशाहीचा कणा - प्रा. डॉ. सचिन पाटील

ललकार
26-01-2022



**सांगली** - रयत शिक्षण संस्थेचे,डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली),ता.पलूस जि. सांगली.राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यान " लोकशाही आणि तरुण मतदार " दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी आयोजित केले होते सदर कार्यक्रमात प्रमुख वक्ते प्रा डॉ सचिन पाटील राज्यशास्त्र विभागप्रमुख श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय इस्लामपूर यांनी लोकशाहीमध्ये तरुण मतदारांची भूमिका तसेच देशाच्या लोकशाही प्रणालीमध्ये तरुण मतदारांची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित प्रा डॉ डी व्ही जाधवविभागीय सहसंचालक पुणे उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. एल.डी .कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे संयोजनप्रा डॉ काकासाहेब भोसले लेफ्टनंट संदेश दौंडे ,प्रा डॉ सचिन चव्हाणविभागप्रमुखराज्यशास्त्र विभाग यांनी केले सदरचा कार्यक्रम घेण्यासाठी मा मिलिंद देशमुख विभागीय सहसंचालक कार्यालय कोल्हापूर महत्वपूर्ण सहकार्य केले सदरच्या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आर्टस् सायन्स अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

**Pudhari** **Date: 20/01/2021**

उपसरपंच दिनकर कुंभार, ग्रामपंचायत सदस्य भगवान पाटील, माजी उपसरपंच [illegible] उपस्थित होते.

पुढारी 20/01/2021

## रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद

**पलूस** : रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात दि २७ व २८ जानेवारी रोजी 'ॲडव्हान्सेस इन मटेरियल सायन्स अँड अपलाईड बायोलॉजी २०२२' या विषयावर पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेमध्ये टर्की, अमेरिका, दक्षिण कोरिया, स्वीडन या देशातून तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित राहणार आहेत. परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापिठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ .पी एस पाटील हे करणार आहेत. तसेच उद्घाटन सत्राचे बीजभाषक प्रा. डॉ अब्देल रहेमान (जॉर्डन) आहेत. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पी. बी. पिस्टे, प्रा. डॉ. गौरी पाटील, प्रा. अभिजीत माने हे संयोजन करत आहेत. परिषदेचे संपूर्ण आयोजन आभासी(व्हर्च्युअल) माध्यमांद्वारे होणार आहे.

आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

केसरी - 15/01/2022

# शैक्षणिक धोरणात डॉ. पतंगराव कदम यांचे योगदान महत्त्वाचे

## - सिकंदर जमादार

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल :** डॉ. पतंगराव कदम हे देशाच्या शैक्षणिक धोरणात आमूलाग्र क्रांती घडवणारे नेतृत्व होते. त्यांनी सहकार, कृषी, शिक्षण सर्व क्षेत्रात गरुडभरारी घेतली. त्यांनी मंत्री असताना जाईल तिथे परिसाप्रमाणे काम केले, असे गौरवोद्गार माजी प्राचार्य सिकंदर जमादार यांनी काढले.

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) येथे डॉ. पतंगराव कदम यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त राज्यशास्त्र विभागाच्यावतीने व्याख्यानाचा कार्यक्रम झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कृष्णाकाठ उद्योगसमूहाचे जे. के जाधव उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एल. डी. कदम म्हणाले, डॉ. पतंगराव कदम यांनी अतिशय जिद्दीने व कष्टाने स्वकर्तृत्वावर यश संपादन केले. असे नेतृत्व होणे नाही.

संयोजन राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. सचिन चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. आभार डॉ. शीतल चव्हाण यांनी मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

दैनिक निर्भीड 20/1/2022 20/1/2022

ल करणे बाबत कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. एकदा अधोरेखित झाले आहे. बबनराव चो

## डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर बुर्ली येथे पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**सांगली** - रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली) येथे दि २७ व २८ जानेवारी रोजी महाविद्यालयातील रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान ,प्राणिशास्त्र व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष या विभागाच्या संयुक्त विद्यमाने पहिली आंतरराष्ट्रीय परिषद Advances in material science and applied biology (ICAMSAB-2022) या विषयावर आयोजित केली आहे

सदरच्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये जगभरातून टर्की, अमेरिका ,दक्षिण कोरिया, स्वीडन या देशातून तज्ञ मार्गदर्शक उपस्थित राहणार आहेत तसेच या परिषदेसाठी सबंध देशभरातून पाचशेहून अधिक संशोधक सहभागी होणार आहेत

परिषदेचे उद्धाटन प्र-कुलगुरू शिवाजी विद्यापीठ प्रा डॉ .पी एस पाटील हे करणार आहेत तसेच उद्धाटन सत्राचे बिजभाषक प्रो डॉ अब्देल रहेमान (जॉर्डन) ,हे आहेत या आंतरराष्ट्रीय परिषदेचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एल डी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रो डॉ पी बी पिस्टे (रसायनशास्त्र), प्रा डॉ गौरी पाटील पदार्थविज्ञान प्रा अभिजीत माने प्राणिशास्त्र हे करत आहेत सदरच्या परिषदेचे संपूर्ण आयोजन कोविडच्या पार्श्वभूमीवर अभासी(व्हर्चुअल) माध्यमांद्वारे होणार आहे. तरी सदरच्या आंतरराष्ट्रीय परिषदेस सबंध भारतातून जास्तीत जास्त संशोधकांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात येते

## सानुग्रह अनुदा झालेल्या अ जीआरसीकडे अ

**धुळे (जिमाका वृत्तसेवा)** मृत झालेल्या रुग्णांच्या निकटच साहाय्य वितरीत करण्यासाठी ma in या पोर्टलवर सानुग्रह स ऑनलाइन अर्ज दाखल करण विविध कारणांमुळे ज्यांचे अर्ज शासनाच्या वरील संकेतस्थळाव to GRC असा संदेश दि त्याचा अर्ज योग्य आणि विश्व असल्यास प्रकरणाच्या फेर त याच संकेतस्थळावर जावून a संदेशावर क्लिक करून GR त्यानंतर अर्जदाराने Online पोर्टलवर सादर झाल्याचे दि कार्यवाहीसाठी शासनाच्या ज्या होतील त्यानुसार अनुपालन आहे, असे निवासी उपजिल्हाधि व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख संजय गायकवाड यांनी प्रसिध्द पत्रकान्वये कळविले आहे.

आर्टस् सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

पुढारी
रविवार, १६ जानेवारी २०२२



पलूस : रामानंदनगर येथे डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना जे. के. बापू जाधव.

# रामानंदनगर येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात व्याख्यानास प्रतिसाद

**पलूस : पुढारी वृत्तसेवा,** रामानंदनगर (बुर्ली) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम झाला. प्रा. डॉ. सिकंदर जमादार यांचे व्याख्यान झाले. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने याचे आयोजन करण्यात आले होते. कृष्णाकाठ उद्योग समूहाचे अध्यक्ष जे. के. बापू जाधव प्रमुख उपस्थित होते. जाधव म्हणाले, स्व. डॉ. पतंगराव कदम यांनी शैक्षणिक धोरणात आमूलाग्र क्रांती घडवली. त्यांनी सहकार, कृषी, शिक्षण अशा सर्व क्षेत्रात मोठे काम केले. या साऱ्याच भागाचा विकास त्यांच्यामुळे झाला आहे. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. सचिन चव्हाण यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. आभार डॉ. शीतल चव्हाण यांनी मानले.

आर्टस् सायन्स अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

जनप्रवास 14/01/ 2022

# डॉ.पतंगराव कदम यांचे देशाच्या शैक्षणिक धोरणात मोलाचे योगदान

## माजी प्राचार्य सिकंदर जमादार यांचे प्रतिपादन

**जनप्रवास । प्रतिनिधी**



रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात व्याख्यानात बोलताना माजी प्राचार्य सिकंदर जमादार. यावेळी उपस्थित मान्यवर.

**पलूस :** डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) येथे डॉ. पतंगराव कदम यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला.

रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथे माजी प्राचार्य सिकंदर जमादार यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना सिकंदर जमादार म्हणाले डॉ. पतंगराव कदम हे देशाच्या शैक्षणिक धोरणात आमूलाग्र क्रांती घडविणारे नेतृत्व होते, त्यांनी सहकार, कृषी, शिक्षण आदी सर्व क्षेत्रांत गरुड भरारी घेतली. त्यांनी मंत्री असताना जाईल तिथे दगडाचे सोने केल्याप्रमाणे परीसा प्रमाणे काम केले.

राज्यशास्त्र विभागाच्यावतीने महाविद्यालयात डॉ. पतंगराव कदम यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून कृष्णाकाठ उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा जे.के (बापू) जाधव उपस्थित होते त्यांनी स्व. पतंगराव कदम यांच्या आठवणींना उजाळा देताना या भागाचा विकास डॉ. पतंगराव कदम यांच्या मूळेच झाला आहे असे मत व्यक्त केले.

मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल. डी.कदम म्हणाले की, डॉ. पतंगराव कदम यांनी अतिशय जिद्दीने व कष्टाने स्वकर्तुत्वावर यश संपादन केले, त्यांचे जीवन व चरित्र यांचा जर अभ्यास केला तर असे लक्षात येईल की असे नेतृत्व होणे... कार्यक्रमाचे संयोजन राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. सचिन चव्हाण यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. ... यांनी केले. आभार डॉ. शितल चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI)
LIBRARY

जनप्रवास 14/01/2022

# देशाच्या शैक्षणिक धोरणात डॉ. पतंगराव कदम साहेबांचे योगदान मोलाचे - माजी प्राचार्य सिकंदर जमादार



**सांगली** - डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (कुर्ली) येथे डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला.

रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथे माजी प्राचार्य सिकंदर जमादार यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले ते म्हणाले डॉ. पतंगराव कदम हे देशाच्या शैक्षणिक धोरणात आमूलाग्र क्रांती घडवणारे नेतृत्व होते, त्यांनी सहकार, कृषी, शिक्षण सर्व क्षेत्रात गरूड भरारी घेतली. त्यानी मंत्री असताना जाईल तिथे दगडाचे सोने केल्याप्रमाणे परीसा प्रमाणे काम केले.

राज्यशास्त्र विभागाच्यावतीने महाविद्यालयात डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कृष्णाकाठ उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा जे.के (बापू) जाधव हे उपस्थित होते यांनी कदम साहेब यांच्या आठवणींना उजाळा देताना या भागाचा विकास डॉ. पतंगराव कदम साहेबांच्या मूळे झाला आहे असे मत व्यक्त केले.

अध्यक्ष मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल. डी.कदम यांनी डॉ. पतंगराव कदम हे अतिशय जिद्दीने व कष्टाने स्वकर्तृत्वावर यश संपादन केले, त्यांचे जीवन व चरित्र यांचा जर अभ्यास केला तर असे लक्षात येईल की असे नेतृत्व होणे नाही. सदर कार्यक्रमाचे संयोजन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सचिन चव्हाण यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण यांनी केले, आभार डॉ. शितल चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य के बी भोसले,डॉटी एस भोसलेतसेच महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

आर्टस् सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (कुर्ली)

# स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त ए.एस.सी. कॉलेज रामानंदनगरमध्ये रक्तदान शिबीर

ललकार 08/01/2022

**। ललकार वृत्त ।**

कुंडल दि. ८ (वार्ताहर) - डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) येथे स्वर्गीय आमदार डॉ.पतंगराव कदम साहेब यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन कृष्णाकाठ उद्योग समूहाचे सर्वेसर्वा जे.के. (बापू)जाधव यांनी केले याप्रसंगी ते म्हणाले डॉ.पतंगराव कदम साहेब यांचे काम खूप मोठे आहे व यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन होत आहे हे खूप महत्त्वाचे आहे असे मत या वेळी व्यक्त केले. याप्रसंगी यशवंत पाटील (मगर),विष्णुपंत रोकडे सर,



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.डी.कदम, उपप्राचार्य डॉ. के.बी.भोसले, डॉ.टी.एस.भोसले, लेफ्टनंट संदेश दैंडि,राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट,राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयातील ५४ विद्या[illegible] रक्तदान करून शिबिर यशस्वी [illegible]ले. एम.एस.आय.ब्लड बँक [illegible]ज यांच्या मार्फत या शिबि[illegible] आयोजन करण्यात आले.

DR. ... KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY

पुढारी संमिश्र सांगली, शनिवार, ८ जानेवारी २०२२




रामानंदनगर : स्व. डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरावेळी जे. के. बापू जाधव, प्राचार्य डॉ. एल. डी. कदम.

# रामानंदनगर येथे स्व. डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**पलूस :** रामानंदनगर (बुर्ली) येथील डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात स्व. डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर पार पडले. कृष्णाकाठ उद्योग समूहाचे संस्थापक जे. के. जाधव यांच्याहस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयातील ५४ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून शिबिर यशस्वी केले. एम. एस. आय. ब्लड बँक मिरज यांच्यामार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी यशवंत पाटील, विष्णुपंत रोकडे, प्राचार्य डॉ.एल. डी. कदम, उपप्राचार्य डॉ. के.बी.भोसले, डॉ.टी. एस. भोसले, संदेश दौंडे उपस्थित होते.

आर्ट्स सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज ग्रंथालय रामानंदनगर (बुर्ली)

औरंगाबाद - 7/01/2022



औरंगाबाद : राज्यस्तरीय ज्युनियर सॉफ्टबॉल स्पर्धेतील विजेते खेळाडू.

# सोलापूर, कोल्हापूर, सांगली, वर्धा, जळगाव संघाला विजेतेपद

## राज्यस्तरीय ज्युनियर सॉफ्टबॉल स्पर्धा

**औरंगाबाद, ता. ६ :** महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशनअंतर्गत औरंगाबाद जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनद्वारा महापालिकेच्या सहकार्याने विभागीय क्रीडा संकुल गारखेडा येथे राज्यस्तरीय ज्युनियर सॉफ्टबॉल स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत मुलांच्या गटात सोलापूर, कोल्हापूर, वर्धा व सांगली; तर मुलींच्या गटात सांगली, कोल्हापूर, लातूर,जळगाव यांनी अनुक्रमे पारितोषिक पटकावले. आमदार हरिभाऊ बागडे, मनपा उपायुक्त सौरभ जोशी यांच्याहस्ते विजेत्या खेळाडूंना चषक, पदकांचे वितरण करण्यात आले.

गुरुवारी झालेल्या उपांत्य सामन्यात अभिषेख पाटील, अथर्व पाटील, तुषार जाधव, आवेज पठाण, संकेत पाटील, हर्ष परियर, उत्कर्ष जोगे, विशाल हरके, रीमा कांबळे, श्रावणी चौघुले, अंजली पवार, दिव्य ठाकरे, तसेच अंतिम सामन्यात समर्थ आहेरवादी, शिवकुमार माळी अभिषेक पाटील यावेगवेगळ्या संघातील खेळाडूंनी होमरन मारून उत्कृष्ठ खेळी केली. सामन्यासाठी पंच म्हणून हर्षद जालनगड, सौरभ टोकसे, विकास वानखेडे, सुजय कल्पेकर, सुयोग कल्पेकार, विकास वानखेडे यांनी काम पहिले. विशाखापट्टणम येथे ११ ते १५ जानेवारीदरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघ उद्या निवडला जाणार आहे. निवडलेल्या मुला, मुलींचे सराव शिबिर औरंगाबाद विभागीय क्रीडा संकुल येथे होणार असून येथूनच राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघ रवाना होणार आहे. मनपा क्रीडा अधिकारी संजीव बालय्या, प्रदीप तळवलकर, सूरजसिंग येवतीकार, नितीन पाटील, मिलिंद तळेले, संतोष खेडे, नारायण बतुले, संदीप लंबे, पंकज भारसाखळे, अभय देशमुख, दीपक रुईकर, विलास चंदणे, राधेशाम शर्मा, किशोर चौधरी, प्रसेनजीत बनसोडे, चेतन महाडिक, अक्षय येवले, गणेश बेट्टे, ऐश्वर्या भास्करण आदी उपस्थित होते. यासाठी दत्ताभाऊ पाथ्रीकर, डॉ. फुलचंद सलामपुरे, गोकुळ तांदळे आदींनी परीश्रम घेतले.

**मुले विभाग :** १) कोल्हापूर वि. वि सांगली (४-०)होमरन २) सोलापूर वि.वि वर्धा (२-१)होमरन

**मुली विभाग :** १) कोल्हापूर वि.वि लातूर (२-०)होमरन, २) सांगली वि.वि जळगाव (२-१) होमरन

**अंतिम सामन्याचे निकाल**

**मुले विभाग :** १) सोलापूर वि.वि.कोल्हापूर (६-१)होमरन

**मुली विभाग :** १) सांगली वि. वि. कोल्हापूर (२-०) होमरन

आर्ट्स सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

सकाळ | सांगली, शुक्रवार, ७ जानेवारी २०२२

RAO KADAM MAHAVIDHALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

# डॉ. पतंगराव कदम जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

किर्लोस्करवाडी, ता. ६ : रामानंदनगर (बुर्ली) येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात दिवंगत आमदार डॉ. पतंगराव कदम यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर झाले. कृष्णाकाठ उद्योग समूहाचे सर्वेसर्वा जे. के. (बापू) जाधव यांनी शिबिराचे उद्घाटन केले. ते म्हणाले,''डॉ. पतंगराव कदम यांचे काम खूप मोठे आहे. त्यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त शिबीराचे आयोजन होत आहे. हे खूप महत्त्वाचे आहे.''

यशवंत पाटील (मगर), विष्णुपंत रोकडे, प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, डॉ. टी. एस. भोसले, लेफ्टनंट संदेश दौंडे, राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयातील ५४ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून शिबीर यशस्वी केले. एम. एस. आय. ब्लड बँक (मिरज) यांच्यामार्फत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराला तरुणांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

पुढारी 26/12/2021



पलूस : रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव.

# विद्यार्थ्यांनी अष्टपैलू असावे : प्राचार्य जाधव

**पलूस : पुढारी वृत्तसेवा** विद्यार्थ्यांनी अष्टपैलू राहून सर्व क्षेत्रांमध्ये नवनवीन गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे, असे मत रयत शिक्षण संस्थेचे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी रामानंदनगर येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यामध्ये व्यक्त केले. यावेळी सांस्कृतिक विभागामार्फत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ. नीता पाटील यांनी काम पाहिले. परिचय डॉ. टी. एस. भोसले यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे, प्रा. नम्रता कांबळे, प्रा. स्वाती मगदूम यांनी केले. काकासाहेब भोसले यांनी आभार मानले.

My Sangli Edition
Dec 26, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

दै. दक्षिण निर्भीड 23/12/2021

दै. दक्षिण निर्भीड

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्व विकसित करण्याचे केंद्र म्हणजे महाविद्यालय होय - प्राचार्य डॉ बी .टी.जाधव



**सांगली** - रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव यांनी प्राध्यापकांनी जादा वेळ दिल्यामुळे गुणी विद्यार्थी निर्माण होत असतात असे मत कार्यक्रमांमध्ये व्यक्त केले.महाविद्यालयामध्ये सर्व सोयी सुविधा असणे खूप महत्त्वाचे आहे मुलांनी या सोयी सुविधांचा पुरेपूर वापर करून आपले चांगले ज्ञान मिळवणे आवश्यक आहे, विद्यार्थ्यांनी विविध स्किल डेव्हलपमेंट चे कोर्सेस करणे गरजेचे आहे आणि शिक्षकांशी सुसंवाद वाढवला पाहिजे, विद्यार्थ्यांनी अष्टपैलू राहून सर्व क्षेत्रांमध्ये नवीन नवीन गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे असे मत रयत शिक्षण संस्थेचे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी रामानंदनगर येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा मध्ये व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.एन. डी. कदम यांनी महाविद्यालय व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र असते व नव्या आव्हानांना सामोरे जाऊन नवीन नवीन गोष्टी शिकल्या पाहिजेत असे मत व्यक्त केले, महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी पदवीचे शिक्षण घेत असताना तीनही वर्षी स्किल डेव्हलपमेंट चे विविध कोर्स करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. महाविद्यालयांमध्ये मागील वर्षी प्रथम, द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना एक हजार रुपये रोख बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले, अकरावी बारावी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले, महाविद्यालयात विविध प्रकारच्या सांस्कृतिक विभागामार्फत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला, यामध्ये निबंध स्पर्धा, पाककला स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, गीत गायन स्पर्धा इत्यादीमध्ये क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले .

त्याच बरोबर महाविद्यालयांमध्ये प्रा. डॉ काकासो भोसले,डॉ. उज्वला पाटील,प्रा. दिलीप कोणे,डॉ. राजेंद्र सोनकांबळे, प्रा. डॉ. निता पाटील, प्रा .डॉ .नितीन कुंभार ,प्रा.डॉ. तेजस चव्हाण, प्राध्यापक सागर कुंडले यांनी विविध विषयांमध्ये प्राविण्य मिळवल्याबद्दल त्यांचाही सत्कार महाविद्यालय तर्फे करण्यात आला. या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ.निता पाटील यांनी काम पाहिले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. टी. एस. भोसले यांनी केले, कार्यक्रमाचे आभार काकासाहेब भोसले यांनी मांडले. सूत्रसंचालन डॉ.अश्विनी लाखुगडे, प्रा .नम्रता कांबळे ,प्रा. स्वाती मगदूम यांनी केले, मोठ्या संख्येने रयत सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

Tarun Bharat 26/12/2021

तरुण भारत २६/१२/२०२१

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी
पलूस

रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा झाला. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव यांनी प्राध्यापकांनी जादा वेळ दिल्यामुळे गुणी विद्यार्थी निर्माण होत असतात असे मत कार्यक्रमांमध्ये व्यक्त केले. महाविद्यालयामध्ये सर्व सोयी सुविधा असणे खूप महत्त्वाचे आहे. मुलांनी या सोयी सुविधांचा वापर करून आपले ज्ञान मिळवणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी विविध स्किल डेव्हलपमेंटचे कोर्सेस करणे गरजेचे आहे आणि शिक्षकांशी सुसंवाद वाढवला पाहिजे, विद्यार्थ्यांनी अष्टपैलू राहून सर्व क्षेत्रांमध्ये नवीन नवीन गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे, असे मत रयत शिक्षण संस्थेचे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी रामानंदनगर येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळामध्ये व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.एल. डी. कदम यांनी महाविद्यालय व्यक्तिमत्व विकासाचे केंद्र असते व नव्या आव्हानांना सामोरे जाऊन नवीन नवीन गोष्टी शिकल्या पाहिजेत असे मत व्यक्त केले, महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी पदवीचे शिक्षण घेत असताना तीनही वर्षी स्किल डेव्हलपमेंटचे विविध कोर्स करणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. महाविद्यालयांमध्ये मागील वर्षी प्रथम, द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना एक हजार रुपये रोख बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. अकरावी-बारावीमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. महाविद्यालयात विविध प्रकारच्या सांस्कृतिक विभागामार्फत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. यामध्ये निबंध स्पर्धा, पाककला स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, गीत गायन स्पर्धा इत्यादीमध्ये क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. महाविद्यालयाचा वार्षिक अंक उपासना याचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



पलूस : सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमात बोलताना मान्यवर.

त्याच बरोबर महाविद्यालयांमध्ये प्रा. डॉ काकासो भोसले,डॉ. उज्ज्वला पाटील, प्रा. दिलीप कोणे, डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. डॉ. निता पाटील, प्रा डॉ. नितीन कुंभार, प्रा.डॉ. तेजस चव्हाण, प्राध्यापक सागर कुडले यांनी विविध विषयामध्ये प्राविण्य मिळवल्याबद्दल त्यांचाही सत्कार महाविद्यालयतर्फे करण्यात आला. या कार्यक्रमासाठी समन्वयक [illegible] डॉ.निता पाटील यांनी काम [illegible] तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय [illegible] टी. एस. भोसले यांनी केले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

सकाळ

दि. 24-12-2021

# बांबवडेत विद्यार्थ्यांनी लुटला उल्का वर्षावाचा आनंद

किर्लोस्करवाडी, ता. १७ : रामानंदनगर येथील आर्टस, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील भौतिक विभागाच्या वतीने गुरुकुल संकुल बांबवडे येथे उल्का वर्षाव व आकाश दर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी व भौतिकशास्त्र विभागाच्या खगोल अभ्यास पथकाने यावेळी आकाशातील ग्रह तारे, तारेसमूह, विविध नक्षत्रसमूह याबद्दल उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उल्का वर्षाव होण्यामागील खगोलीय कारणांची शास्त्रीय माहिती दिली. ताऱ्यांच्या आधारे दिशा कशा पद्धतीने ओळखाव्यात याबद्दलही माहिती दिली. खगोलीय दुर्बिणीद्वारे विविध ग्रहांबरोबर उल्कापाताचे दर्शन घडविले. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी विशेष मार्गदर्शन केले. डॉ. वनिता राऊत, प्रा. नम्रता कांबळे, डॉ. गौरी पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. जितेंद्र संकपाळ व यादव यांचे सहकार्य लाभले.



बांबवडे येथे उल्का वर्षाव पाहण्यासाठी आलेले विद्यार्थी.

REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA

आर्ट्स सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

सांगली - 13/12/2021 2021

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालच्या वतिने उल्कावर्षाव व आकाशदर्शन कार्यक्रम संपन्न



**सांगली** - डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथील भौतिकशास्त्र विभागामार्फत दि ११ डिसेंबर २०२१ रोजी रात्री गुरुकुल संकुल, बांबवडे येथे उल्कावर्षाव व आकाशदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.


या कार्यक्रमादरम्यान भौतिकशास्त्र विभाग व स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँण्ड टेक्नॉलॉजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील खगोल अभ्यासक पथकाने आकाशातील ग्रह, तारे, तारकासमूह, विविध नक्षत्रे याबाबत मार्गदर्शन केले तसेच उल्कावर्षाव व त्यामागील विज्ञान याबाबत माहिती देवून खगोलीय दुर्बिणीतून मंगळ, शुक्रग्रह, विविध नक्षत्रांचे, दर्शन घडविले. त्यावरून रात्री दिशा कशी ओळखायची, तसेच खगोलीय दुर्बिनीबाबत सखोल माहिती दिली. या कार्यक्रमास भौतिकशास्त्र विभागाचा भाग-३ च्या विदयार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच गुरुकुल संकुल बांबवडे येथील इयत्ता १२वी तील विद्यार्थी सहभागी झाले.

रामानंदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली भौतिकशास्त्र विभागामार्फत या उल्कावर्षाव व आकाशदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ. गौरी पाटील, समन्वयक प्रा. नम्रता कांबळे व प्रा. प्रशांत भाग्यवंत यांनी विशेष परिश्रम घेतले हा कार्यक्रम पार पाडणेसाठी, गुरुकुल संकुल बांबवडेचे संस्थापक श्री [illegible] संकपाळ, यादवसर, [illegible] व इतर शिक्षकांचे विशेष सहकार्य लाभले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA • RAMANANDNAGAR (BURLI) • LIBRARY

पुढारी 18-12-2021

# ध्येयप्राप्तीसाठी परिश्रमाशिवाय पर्याय नाही : पिंगळे



रामानंदनगर : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षांसाठी आयोजित कार्यक्रमात बोलताना कृष्णात पिंगळे.

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

ध्येय साध्य करण्यासाठी तरुणांनी सातत्याने प्रयत्नशील रहावे. प्रामाणिकपणे केलेल्या कष्टांचे चीज कधी ना कधी तरी होत असते. तेव्हा तरुणांनी विद्यार्थिदशेतच अभ्यासू व जिज्ञासू वृत्तीने जग समजून घेण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे मत उपविभागीय पोलिस अधिकारी कृष्णात पिंगळे यांनी मांडले.

ते रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राच्यावतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. ते पुढे म्हणाले, अलिकडच्या काळातील तरुण पिढी पूर्णपणे मोबाईलच्या आहारी गेली आहे. मोबाईलच्या अती वापरामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरचे मोठे नुकसान होत आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य वापर करण्यावर भर द्यावा.

प्राचार्य डॉ. कदम प्रमुख उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले, उपप्राचार्य डॉ. तानाजी भोसले, डॉ. सचिन चव्हाण उपस्थित होते. प्रा. स्वाती मगदूम यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. धनेश गवारी यांनी आभार मानले.

My Sangli Edition
Dec 18, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

# देशाच्या विकासात पद्मभूषण खा.शरदचंद्रजी पवार यांचे योगदान -डॉ विश्वनाथ पवार



**सांगली** - डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली) ता.पलुस जि. सांगली या महाविद्यालयांमध्ये इतिहास विभाग व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या माध्यमातून मा. शरद पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने,'शरदचंद्रजी पवार जीवन व कार्य' याबाबत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. विश्वनाथ पवार तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य डॉ. कदम साहेब होते. यावेळी बोलताना डॉ. विश्वनाथ पवार म्हणाले की, मा. शरद पवार १९७८, १९८८, १९९० आणि १९९३ असे चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. या कालखंडामध्ये त्यांनी किल्लारीचा भूकंप बाबत त्याठिकाणी पंधरा दिवस राहून भूकंप मधून लोकांना सावरण्याचा प्रयत्न केला. मा मनमोहन सिंग पंतप्रधान असताना मा. शरद पवार कृषिमंत्री झाले. कृषिमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन ७० हजार कोटी रुपये कर्जमाफी दिली. कृषी व पूरक उद्योग निर्माण केले. मा. शरद पवार यांनी मराठवाडा विद्यापीठ, चा नामांतराचा प्रश्न मार्गी लावला. अशा प्रकारे शरद पवारांचे शिक्षण, सांस्कृतिक, उद्योग, कृषी व सामाजिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये मोठे योगदान आहे. महाराष्ट्राच्या राजकारण आणि समाजकारणामध्ये त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. या कार्यक्रमामध्ये अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. कदम साहेब यांनी शरद पवार यांच्या जीवन व कर्तृत्वाचा संक्षिप्त आढावा घेतला. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य विषद केले. मा. शरद पवार यांच्यामुळे आज रयत शिक्षण संस्था प्रगतीपथावर आहे. असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सचिन चव्हाण यांनी केले तर आभार प्रा. अभिजीत माने यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचा शिक्षक स्टाफ हजर होता.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

सकाळ
मंगळवार,
१४ डिसेंबर २०२१

# अभ्यासू व जिज्ञासू वृत्ती ठेवा : पिंगळे

किर्लोस्करवाडी, ता. १३ : ध्येय साध्य करण्यासाठी तरुणांनी सातत्याने प्रयत्नशील राहावे. प्रामाणिकपणे केलेल्या कष्टाचे चीज कधी ना कधी तरी होत असते. तेव्हा तरुणांनी आपल्या विद्यार्थिदशेत अभ्यासू व जिज्ञासू वृत्तीने जग समजून घेण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे मत पोलिस उपाधीक्षक कृष्णात पिंगळे यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पिंगळे म्हणाले, अलीकडच्या काळातील तरुण पिढी पूर्णपणे मोबाईलच्या आहारी गेली आहे. मोबाईलच्या अती वापरामुळे विद्यार्थ्यांचे करीयरचे मोठे नुकसान होत आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य वापर करण्यावर भर द्यावा.महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांच्या वतीने ''स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी'' या विषयावरती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भीत्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कदम होते. "महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी भविष्याच्या दृष्टीने आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास केला पाहिजे. त्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. स्वतः समोर चांगले आदर्श ठेवून त्यांच्या विचाराप्रमाणे वागले व जगले पाहिजे. चांगल्या लोकांचा सहवास आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी उपयोगी ठरत असतो. यावेळी डॉ. काकासाहेब भोसले, डॉ. तानाजी भोसले, प्रा. धनेश गवारी, डॉ. सचीन चव्हाण व शिक्षक वृंद उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

आर्टस् सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

दै. दक्षिण निर्भीड दि. 14/12/2021

संमिश्र

दै. दक्षिण निर्भीड

# सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची चाड असणारा लोकनेता म्हणजे मा. शरद पवार - अनील घाटगे



सातारा - "महाराष्ट्रासह [illegible]च्या सर्वांगीण विकासामध्ये मा. [illegible] पवार यांनी मोलाचे योगदान [illegible] आहे. एकिकडे शेतकरी, [illegible]. कामगार यांचा हिताचा [illegible] करत असताना समांतरपणे उद्योग-धंद्यांचे विकेंद्रीकरण करण्याचे महत्त्वाचे काम मा. पवार यांनी केले. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासदर वाढीचे बहुतेक सारे श्रेय मा. शरद पवारांना द्यावे लागेल. असे मत मा. अनील घाटगे यांनी व्यक्त केले. रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शरद पवार : राजकीय, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रातील ६० वर्षांची वाटचाल या विषयावर ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले होते. "सत्यशोधक विचारानुसार बहुजन समाजाच्या सर्वांगीण हिताचा विचार करणारे दूरदृष्टी असणारे राजकीय नेते मा. शरद पवार यांच्या रूपाने महाराष्ट्राला मिळाले आहेत. धर्मनिरपेक्ष भूमिकेतून राजकीय आणि सामाजिक योगदान देण्याचे महत्त्वाचे कार्य मा. शरद पवार यांनी केले आहे." असे मत डॉ. भोसले यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले.

यावेळी उपप्राचार्य (विज्ञान) डॉ. तानाजी भोसले, मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने, डॉ. तेजस चव्हाण, शिक्षक वृंद उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले; तर आभार डॉ. शीतल पाटील मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र आणि मराठी विभागाच्या वतीने करण्यात आले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

लोकमत
रविवार १२.१२.२०२१

आर्ट्स सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

# ध्येय प्राप्तीसाठी परिश्रमाशिवाय पर्याय नाही

## कृष्णात पिंगळे : रामानंदनगर येथे कदम महाविद्यालयात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**सावंतपूर :** ध्येय साध्य करण्यासाठी तरुणांनी सातत्याने प्रयत्नशील राहावे. प्रामाणिकपणे केलेल्या कष्टाचे चीज कधी ना कधी तरी होत असते. तेव्हा तरुणांनी आपल्या विद्यार्थिदशेत अभ्यासू व जिज्ञासू वृत्तीने जग समजून घेण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे पोलीस उपाधीक्षक कृष्णात पिंगळे म्हणाले.

रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम अध्यक्षस्थानी होते.

ते म्हणाले, अलीकडच्या काळातील तरुण पिढी पूर्णपणे मोबाइलच्या आहारी गेली आहे. मोबाइलच्या अती वापरामुळे विद्यार्थ्यांचे करिअरचे मोठे नुकसान होत आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी मोबाइलचा योग्य वापर करण्यावर भर द्यावा.

प्राचार्य डॉ. कदम म्हणाले, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी भविष्याच्या दृष्टीने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केला पाहिजे. त्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. प्रयत्नांमध्ये सातत्य असल्यास यश मिळते.

यावेळी उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले, उपप्राचार्य डॉ. तानाजी भोसले, समन्वय प्रा. धनेश गवारी, डॉ. सचिन चव्हाण आदींसह शिक्षक उपस्थित होते. प्रा. स्वाती मगदूम यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. धनेश गवारी यांनी आभार मानले.

# ध्येयप्राप्तीसाठी परिश्रमाशिवाय पर्याय नाही

## कृष्णात पिंगळे

। ललकार वृत्त ।

पलूस दि. १० (वार्ताहर) – ध्येय साध्य करण्यासाठी तरुणांनी सातत्याने प्रयत्नशील रहावे. प्रामाणिकपणे केलेल्या कष्टाचे चीज कधी ना कधी तरी होत असते. तेव्हा तरुणांनी आपल्या विद्यार्थीदशेत अभ्यासू व जिज्ञासू वृत्तीने जग समजून घेण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे पोलीस उपाधीक्षक कृष्णात पिंगळे म्हणाले. रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, अलीकडच्या काळातील तरुण पिढी पूर्णपणे मोबाईलच्या आहारी गेली आहे. मोबाईलच्या आती वापरामुळे विद्यार्थ्यांचे



करीयरचे मोठे नुकसान होत आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य वापर करण्यावर भर द्यावा.

महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने 'स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी' या विषयावरती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भीत्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कदम होते. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी भविष्याच्या दृष्टीने आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास केला पाहिजे. त्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. स्वतः समोर चांगले आदर्श ठेवून त्यांच्या विचाराप्रमाणे वागले व जगले पाहिजे. चांगल्या लोकांचा सहवास आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी उपयोगी ठरत असतो. असे मत डॉ. कदम यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले.

यावेळी उपप्राचार्य (कला) डॉ. काकासाहेब भोसले, उपप्राचार्य (विज्ञान) डॉ. तानाजी भोसले, समन्वय प्रा. धनेश गवारी, डॉ. सचीन चव्हाण व शिक्षक वृंद उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले; तर आभार प्रा. धनेश गवारी यांनी मानले.

दैनिक ललकार, पृष्ठ ३, दि. ११.१२.२०२१

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

सातारा - गुरुवार दि 09/12/2021

# डॉ राजेंद्र सोनावले यांना गुणवंत सत्यशोधक प्राध्यापक पुरस्कार प्राप्त



**सातारा -** डॉ पतंगराव कदम महाविद्यालय रामनगर बुर्ली या महाविद्यालयातील इतिहास विभागातील विभाग प्रमुख प्रा डॉ राजेंद्र सोनवले यांना राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ यांच्या माध्यमातून दिला जाणारा मानाचा राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले राज्यस्तरीय गुणवंत सत्यशोधक प्राध्यापक पुरस्कार सोलापूर येथे मा वामन मेश्राम राष्ट्रीय अध्यक्ष RMBKS यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला या निमित्त महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एल डी कदम साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ के बी भोसले, डॉ टी एस भोसले, संस्कृती विभाग प्रमुख प्रा दिलीप कोणे, प्रा संदेश दौंडे, डॉ सचिन चव्हाण, कार्यालय प्रमुख सुहास सौंदडे, संपतराव रसाळ उपस्थित होते.

आर्ट्स सायन्स अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

सकाळ दि. ५/१२/२०२१



किर्लोस्करवाडी : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्यावतीने डॉ. नितीन हिंदूराव कुंभार यांचा सत्कार करण्यात आला.

# डॉ. नितीन कुंभार यांना पीएच.डी.

सकाळ वृत्तसेवा

किर्लोस्करवाडी, ता. ४ : रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली) येथील हिंदी विषयाचे प्राध्यापक डॉ. नितीन हिंदूराव कुंभार यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी.पदवी मिळाली. त्यांनी "२१वीं सदी का सामाजिक व्यंग्य कहानी साहित्य" या विषयावर आपला शोध प्रबंध सादर केला होता, यासाठी त्यांना एल बी एस कॉलेज साताराचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. भरत सगरे यांचे मार्गदर्शन मिळाले.

यावेळी रामानंदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम व स्टाफ यांनी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे दोन्ही विभागांचे उपप्राचार्य व महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ
बुधवार,
२७ ऑक्टोबर २०२१



रामानंदनगर : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या कार्यक्रमात बोलताना जे. के. जाधव.

# डॉ. कदम महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

किर्लोस्करवाडी, ता. २६ : सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण करणाऱ्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या समन्वय समितीचे सदस्य जे. के. जाधव यांनी केले. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते.

जाधव म्हणाले, ''माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचे मूल्यमापन करीत त्यांच्या उल्लेखनीय कर्तृत्वाचा लेखाजोखा महत्त्वाचा आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्त्व प्रणालीनुसार सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम या महाविद्यालयाने आजतागायत केले आहे, हे महाविद्यालय कर्मवीरांनी स्थापन केले.'' महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कदम म्हणाले,''परिसरातील गावातून विद्यार्थ्यांना विद्यालयात येण्यासाठी एसटी बस चालू होण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी पाठपुरावा करावा. तुम्ही विद्यार्थी येण्याची सोय करा मी माझ्या प्राध्यापक वर्ग २४ तास मुक्कामी विद्यालयाच्या सेवेसाठी ठेवेन.''

यावेळी श्रीकांत लाड, दादासो पाटील, हृदयनाथ सावंत, मोरे, किशोर आरबुने, लेखक संदीप नाझरे, उद्योजक अरुण सावंत, मोहन धनवडे, अमृत यादव, संजय कुंभार, तुकाराम धायगुडे, ॲड. कांबळे, प्रा. संजय पाटील, प्रा. डी. एम. जाधव आदी उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

दैनिक ललकार 25-10-2021 संमिश्र

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय हे पलुस तालुक्यातील नामांकित महाविद्यालय

## जे.के.जाधव; माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

पलूस दि. २२ (वार्ताहर) - पलूस तालुक्यातील नामांकित महाविद्यालय म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर ने नावलौकिक संपादन केला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण करणारे हे महाविद्यालय महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या, समन्वय समितीचे सदस्य मा. जे.के (बापू) जाधव यांनी केले. ते रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते.



यावेळी ते पुढे म्हणाले, माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचे मूल्यमापन करीत त्यांच्या उल्लेखनीय कर्तुत्वाचा लेखाजोखा महत्त्वाचा आहे, शिवाय महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थी संघ मजबूत होणे गरजेचे आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्त्व प्रणाली नुसार सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम या महाविद्यालयाने आजतागायत केले आहे, हे महाविद्यालय कर्मवीरांनी स्थापन केले. महाविद्यालय या परिसरात काढून अनेकांचा उद्धार केला आहे. या जाणिवेने महाविद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी कटिबद्ध राहावे असे मत त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले. या माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी श्रीकांत (नाना) लाड, दादासो पाटील, हदयनाथ सावंत, माजी इन्स्पेक्टर मोरे सर, किशोर आरबुने, लेखक संदीप नाझरे, उद्योजक अरुण सावंत, मोहन धनवडे, अमृत यादव, संजय कुंभार, तुकाराम धायगुडे, ऍड कांबळे के.डी,प्रा संजय पाटील, प्रा. डी एम. जाधव,प्रा बी.बी कदम इत्यादी उपस्थित होते.

माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष यांनी मागील न्याक साठी केलेल्या कामाचा लेखा जोखा सांगितला,खूप मेहनतीने माजी विद्यार्थी संघ मजबूत केला आहे. असे मत माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. व्ही.डी. साळुंखे यांनी व्यक्त केले. माजी विद्यार्थी नितीन जाधव यांनी दहा हजार रुपये देणगी माजी विद्यार्थी संघटनेला दिली, महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ कदम यांनी महाविद्यालय कोणत्याच विकासात्मक व शैक्षणिक दृष्टिकोनात कमी पडणार नाही याची ग्वाही दिली. कार्यक्रमाचे स्वागत डॉ उज्वला पाटील व मनोगत प्रा संदेश दौंडे व आभार डॉ टी. एस भोसले मानले, सूत्रसंचालन तेजस चव्हाण,नम्रता [illegible] यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

LIBRARY ...TANGRAO KADAM MAHAVIDYALAYA

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA
RAMANANDNAGAR (BURLI)
LIBRARY

पुढारी
MY सांगली
रविवार, २४ ऑक्टोबर २०२१

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय आदर्शवत

## जे. के. (बापू) जाधव यांचे गौरवोद्गार : माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

पलूस तालुक्यातील नामांकित महाविद्यालय म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने लौकिक संपादन केला आहे. सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण करणाऱ्या या महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या समन्वय समितीचे सदस्य जे. के. (बापू) जाधव यांनी केले.



**पलूस : रामानंदनगर येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना जे. के. (बापू) जाधव.**

ते रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते. ते पुढे म्हणाले, माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचे मूल्यमापन करीत त्यांच्या उल्लेखनीय कर्तृत्वाचा लेखाजोखा महत्त्वाचा आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्त्वप्रणालीनुसार सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम या महाविद्यालयाने केले आहे. हे महाविद्यालय कर्मवीरअण्णांनी स्थापन केले. महाविद्यालय या परिसरात काढून अनेकांचा उद्धार केला आहे. या जाणिवेने महाविद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी कटिबद्ध राहावे, असे मत त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

मेळाव्यासाठी श्रीकांत लाड, दादासो पाटील, हृदयनाथ सावंत, संदीप नाझरे, उद्योजक अरुण सावंत, तुकाराम धायगुडे उपस्थित होते. माजी विद्यार्थी नितीन जाधव यांनी दहा हजार रुपये देणगी माजी विद्यार्थी संघटनेला दिली. प्राचार्य डॉ. कदम यांनी महाविद्यालय विकासात्मक व शैक्षणिक दृष्टिकोनात कमी पडणार नाही, याची ग्वाही दिली. स्वागत डॉ. उज्ज्वला पाटील यांनी केले. प्रा. संदेश दौंडे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. टी. एस. भोसले यांनी मानले. माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DR. PATANGRAO KA...

दैनिक वाळवा क्रांती 24/10/2021

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय हे पलुस तालुक्यातील नामांकित महाविद्यालय : जे.के.जाधव

## माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**दै. वाळवा क्रांती \ कुंडल**

पलूस तालुक्यातील नामांकित महाविद्यालय म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर ने नावलौकिक संपादन केला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण करणारे हे महाविद्यालय महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या, समन्वय समितीचे सदस्य मा. जे.के (बापू) जाधव यांनी केले.

ते रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी ते पुढे म्हणाले, माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचे मूल्यमापन करीत त्यांच्या उल्लेखनीय कर्तुत्वाचा लेखाजोखा महत्वाचा आहे. शिवाय महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थी संघ मजबूत होणे गरजेचे आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्व प्रणाली नुसार सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम या महाविद्यालयाने आजतागायत केले आहे. हे महाविद्यालय कर्मवीरांनी स्थापन केले. महाविद्यालय या परिसरात काढून अनेकांचा उद्धार केला आहे. या जाणिवेने महाविद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी कटिबद्ध रहावे असे मत त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले. या माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी श्रीकांत लाड, दादासो पाटील, इंद्रनाथ सावंत, किशोर आखुने, लेखक संदीप नाझरे, उद्योजक अरुण सावंत, मोहन धनवडे, अमृत यादव, संजय कुंभार, तुकाराम घाडगे, कांबळे के.डी.,प्रा संजय पाटील, प्रा. डी एस. जाधव,प्रा बी.बी कदम इत्यादी उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष यांनी मागील न्याक साठी केलेल्या कामाचा लेखा जोखा सांगितला. खूप मेहनतीने माजी विद्यार्थी संघ मजबूत केला आहे. असे मत माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्र. व्ही.डी. साळुंखे यांनी व्यक्त केले.माजी विद्यार्थी नितीन जाधव यांनी दहा हजार रुपये देणगी माजी विद्यार्थी संघटनेला दिली.महाविद्यालयाचे प्राचार्य व डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय हे पलुस तालुक्यातील नामांकित महाविद्यालय : जे.के.जाधव, माजी विद्यार्थी मेळावा उत्साहातपलूस तालुक्यातील नामांकित महाविद्यालय म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर ने



रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात जे. के (बापू) जाधव यांनी मार्गदर्शन केले.

नावलौकिक संपादन केला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण करणारे हे महाविद्यालय महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या, समन्वय समितीचे सदस्य मा. जे.के (बापू) जाधव यांनी केले.ते रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते.यावेळी ते पुढे म्हणाले, माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचे मूल्यमापन करीत त्यांच्या उल्लेखनीय कर्तुत्वाचा लेखाजोखा महत्वाचा आहे. शिवाय महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थी संघ मजबूत होणे गरजेचे आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्व प्रणाली नुसार सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम या महाविद्यालयाने आजतागायत केले आहे. हे महाविद्यालय कर्मवीरांनी स्थापन केले. महाविद्यालय या परिसरात काढून अनेकांचा उद्धार केला आहे. या जाणिवेने महाविद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी कटिबद्ध रहावे असे मत त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले. या माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी श्रीकांत (नाना) लाड, दादासो पाटील, इंद्रनाथ सावंत, माजी इन्स्पेक्टर मोरे सर, किशोर आखुने, लेखक संदीप नाझरे, उद्योजक अरुण सावंत, मोहन धनवडे, अमृत यादव, संजय कुंभार, तुकाराम घाडगे, ऍड कांबळे के.डी.,प्रा संजय पाटील, प्रा. डी एस. जाधव,प्रा बी.बी कदम इत्यादी उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष यांनी मागील न्याक साठी केलेल्या कामाचा लेखा जोखा सांगितला.खूप मेहनतीने माजी विद्यार्थी संघ मजबूत केला आहे. असे मत माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. व्ही.डी. साळुंखे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ कदम यांनी महाविद्यालय कोणत्याच विकासात्मक व शैक्षणिक दृष्टिकोनात कमी पडणार नाही याची ग्वाही दिली.कार्यक्रमाचे स्वागत डॉ उज्वला पाटील व मनोगत प्रा संदेश दौंड व आभार डॉ टी. एस भोसले मानले, सूत्रसंचालन तेजस चव्हाण,नम्रता कांबळे यांनी केले , यावेळी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत डॉ उज्वला पाटील व मनोगत प्रा संदेश दौंड व आभार डॉ टी. एस भोसले मानले, सूत्रसंचालन तेजस चव्हाण,नम्रता कांबळे यांनी केले, यावेळी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

AURANGABAD Edition
Oct 24, 2021 Page No. 2
Powered by : eReleGo.com

जनप्रवास 23-11-2021

# पलूस तालुक्यातील डॉ. पतंगराव कदम हे नामांकित महाविद्यालय : जे. के. बापू जाधव

## ■ माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

जनप्रवास। वार्ताहर

दुधोंडी : पलूस तालुक्यातील नामांकित महाविद्यालय म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर ने नावलौकिक संपादन केला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण करणाऱ्या या महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या, समन्वय समितीचे सदस्य जे. के. (बापू) जाधव यांनी केले.

ते रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी ते पुढे म्हणाले, माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचे मूल्यमापन करीत त्यांच्या उल्लेखनीय



रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना जे. के. (बापू) जाधव, व्यासपीठावर इतर मान्यवर.

कर्तृत्वाचा लेखाजोखा महत्त्वाचा आहे, शिवाय महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थी संघ मजबूत होणे गरजेचे आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्त्वज्ञानानुसार सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम या महाविद्यालयाने आजतागायत केले आहे. हे महाविद्यालय कर्मवीरांनी स्थापन केले.

महाविद्यालय या परिसरात काढून अनेकांचा उद्धार केला आहे. या जाणिवेने महाविद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी कटिबद्ध राहावे, असे मत त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष यांनी मागील नोकऱ्यासाठी केलेल्या कामाचा लेखा जोखा सांगितला, खूप मेहनतीने माजी विद्यार्थी संघ मजबूत केला आहे, असे मत माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. पी. डी. साळुंखे यांनी व्यक्त केले.

माजी विद्यार्थी नितीन जाधव यांनी दहा हजार रुपये देणगी माजी विद्यार्थी संघटनेला दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कदम यांनी महाविद्यालय कोणत्याच विकासात्मक व शैक्षणिक दृष्टिकोनात कमी पडणार नाही याची ग्वाही दिली.

या माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी श्रीकांत (नाना) लाड, दादासो पाटील, हृदयनाथ सावंत, माजी इन्स्पेक्टर मोरे सर, किशोर आरबुने, लेखक संदीप नाझरे, उद्योजक अरुण सावंत, मोहन धनवडे, अमृत यादव, संजय कुमार, तुकाराम धायगुडे, ॲड. कांबळे के. डी., प्रा. संजय पाटील, प्रा. डी. एम. जाधव, प्रा. बी. बी. कदम आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत डॉ उज्ज्वला पाटील व मनोगत प्रा. संदेश दीडे व सूत्रसंचालन तेजस चव्हाण, नम्रता कांबळे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार डॉ. टी. एस. भोसले यांनी मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA RAMANANDNAGAR (BURLI) LIBRARY

पुढारी MY सांगली शुक्रवार, २२ ऑक्टोबर २०२१

## डॉ. कदम महाविद्यालयात आज माजी विद्यार्थी मेळावा

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**, रामानंदनगर (ता.पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात शुक्रवारी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य जे. के. जाधव हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. परिसरातील सर्व माजी विद्यार्थ्यांनी मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एल. डी.कदम, व्ही. डी. साळुंखे यांनी केले आहे.

सकाळ शुक्रवार २२ ऑक्टोबर २०२१

## आजी-माजी विद्यार्थी मेळावा

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात शुक्रवारी (ता. २२) माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व्ही. डी. साळुंखे यांनी केले आहे. माजी विद्यार्थी मेळाव्यात महाविद्यालय विकास समितीचे सदस्य जे. के. (बापू) जाधव हे मार्गदर्शन करणार आहेत.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

# शिक्षकांनी उपेक्षित बहुजनांचा पाठीराखा बनावे : ॲड. रवींद्र पवार

**किर्लोस्करवाडी :** समाजातील आदर्श शिक्षक हा आपल्या विचारांशी व तत्त्वांशी बांधिल असतो. शिक्षकांनी उपेक्षित बहुजन समाजातील लोकांचे पाठीराखे बनावे. नव्या शैक्षणिक धोरणाची समाजाभिमुख चिकित्सा करणे गरजेचे आहे, असे मत ॲड. रवींद्र पवार यांनी व्यक्त केले. रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात शिक्षकदिनी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महेंद्र लाड म्हणाले, शिक्षक समाजाच्या परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतात. बदलत्या काळाला शिक्षकांनी आत्मविश्वासाने समोरे गेले पाहिजे. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. लक्ष्मण कदम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. प्रा. प्रतीभा पुदाले यांनी आभार मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ
सोमवार, ६ सप्टेंबर २०२१

# समाजामध्ये नवी पिढी घडवण्याचे सामर्थ्य शिक्षकांत

## ॲड. रवींद्र पवार : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात शिक्षक दिन

किर्लोस्करवाडी, ता. ५ : "शिक्षक हा खऱ्या अर्थाने समाजाचा अध्वर्यू आहे. पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील उद्याची स्वप्ने सत्यात उतरवण्याचे महनीय कार्य शिक्षक पार पाडत असतात. समाजातील आदर्श शिक्षक हा आपल्या विचारांशी व तत्त्वांशी बांधील असतो. महापुरुषांची चरित्रे वाचून आत्मचिंतन करत, समाजामध्ये नवी पिढी घडवण्याचे सामर्थ्य शिक्षकाकडे असते," असे मत ॲड. रवींद्र पवार यांनी व्यक्त केले. रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.




रामानंदनगर : येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना ॲड. रवींद्र पवार.

"शिक्षकांना दबलेल्यांचा आवाज बनता आले पाहिजे. तसेच शिक्षकांनी उपेक्षित बहुजन समाजातील लोकांचे पाठीराखे झाले पाहिजे. शिक्षकांनी नव्या शैक्षणिक धोरणाची समाजाभिमुख चिकित्सा करणे गरजेचे आहे." असे ते पुढे म्हणाले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महेंद्र (आप्पा) लाड यांनी केले. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी केले. सांस्कृतिक विभागाच्या वतीने शिक्षक-सेवकांचा सत्कार झाला. आभार प्रा. प्रतिभा पुदाले यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण यांनी केले.

PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

# पुणदीमध्ये स्वच्छता, धान्य वाटप

केसरी 17/08/2021

केसरी वृत्तसेवा

**कुंडल :** रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय व महाविद्यालयाचा एनसीसी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या माध्यमातून पुणदीमध्ये पूरबाधित कुटुंबांना किराणा साहित्य वाटप करण्यात आले. गावातील गणेश मंदिर, हनुमान मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय परिसरातील स्वच्छतेसाठी या विद्यार्थ्यांनी श्रमदान केले.

कार्यक्रमास पुणदीचे सरपंच संपतराव पाटील, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, प्राचार्य डॉ एल. डी. कदम, एन. सी. सी. प्रमुख लेफ्टनंट प्रा. संदेश दौंडे, एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. काकासाहेब भोसले, डॉ. अशोक खाडे, नम्रता कांबळे, तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामार्फत पुणदीमध्ये स्वच्छता करण्यात आली.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA LIBRARY

सकाळ 18-08-2021 ४

# पुणदीत पूरबाधितांना मदत

सकाळ वृत्तसेवा

किर्लोस्करवाडी, ता. १० : रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय व महाविद्यालयाचा एनसीसी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या माध्यमातून महापुरामध्ये बाधित झालेल्या पुणदी गावामध्ये बाधित कुटुंबांना गहू, तांदूळ, साखर, चहा पावडर आदी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप झाले. तसेच गावातील गणेश मंदिर, हनुमान मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय या परिसरातील स्वच्छता करण्यासाठी महाविद्यालयाच्या वतीने श्रमदान कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांचे मनोगत झाल. यावेळी पुणदीचे सरपंच संपतराव पाटील (पापा), उपसरपंच व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, एनसीसी प्रमुख लेफ्टनंट प्रा. संदेश दौंडे, प्रा. डॉ. काकासाहेब भोसले, डॉ. अशोक खाडे

PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

दैनिक वाळवा क्रांती - 18-08-2021

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्यावतीने पूरग्रस्त भागाची स्वच्छता व गरजूंना धान्य वाटप

**दै. वाळवा क्रांती \ कुंडल**

कुंडल रामानंदनगर ता- पलूस येथील रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय व महाविद्यालयाचा एनसीसी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाम यांच्या माध्यमातून २०२१ सालच्या महापुरामध्ये बाधित झालेल्या पुणदी गावांमध्ये पुरबाधीत कुटुंबांना गहू, तांदूळ, साखर, चहा पत्ती इत्यादी वस्तूंचे वाटप तसेच त्या गावातील गणेश मंदिर, हनुमान मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय या परिसरातील स्वच्छता करण्यासाठी महाविद्यालयाच्या वतीने श्रमदान कार्यक्रम आयोजित केला होता.



पुरग्रस्तांना मदतीचे वाटप करताना पुणदीचे सरंप संपतराव पाटील आदी.

सदर कार्यक्रमास पुणदी गावचे सरपंच संपतराव पाटील , उपसरपंच व ग्र.प सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एल.डी. कदम, एन.सी.सी. प्रमुख [illegible] स एस कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ काकासाहेब भोसले ,डॉ अशोक खाडे, कु. नम्रता कांबळे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

दै. केसरी 18-08-2021

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वतीने पूरग्रस्त भागाची स्वच्छता व गरजूंना धान्य वाटप





**सांगली** - जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील किर्लोस्करवाडी येथील रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय व महाविद्यालयाच्या एनसीसी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या माध्यमातून २०२१ सालच्या महापुरा मध्ये बाधित झालेल्या भी पुणदी गावांमध्ये पुरबाधीत कुटुंबांना गहू, तांदूळ, साखर, चहा पत्ती इत्यादी वस्तूंचे वाटप तसेच त्या गावातील गणेश मंदिर, हनुमान मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय या परिसरातील स्वच्छता करण्यासाठी महाविद्यालयाच्या वतीने श्रमदान कार्यक्रम आयोजित केला होता.

सदर कार्यक्रमास पुणदी गावचे सरपंच संग्रामराव पाटील (पापा), उपसरपंच व ग्रा.प सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस.डी. कदम,एन.सी.सी. प्रमुख लेफ्टनंट प्रा. संदेश दौंडे, एन एस एस कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ काकासाहेब भोसले, डॉ अशोक खाडे,कु. नमता कांबळे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ दिनांक :- 18-08-2



किर्लोस्करवाडी : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्यावतीने पूरग्रस्त भागात गरजूंना धान्य वाटप करताना प्राध्यापक.

## बुर्लीत स्वच्छता, गरजूंना धान्य वाटप

**दुधोंडी** :,रयत शिक्षण संस्थेच्या किर्लोस्करवाडी (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय व एनसीसी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महापूर बाधित बुर्लीमध्ये गहू, तांदूळ, साखर, चहा अशा जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. ज्योतिर्लिंग मंदिर, शाळा परिसरात स्वच्छतेसाठी श्रमदानाचे आयोजन केले होते. बुर्लीचे सरपंच राजेंद्र चौगुले, उपसरपंच व ग्रा. पं. सदस्य व प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, एन.सी.सी. प्रमुख लेफ्टनंट प्रा. संदेश दौंडे, एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ. काकासाहेब भोसले, डॉ. अशोक खाडे, महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी, ग्रामस्थ सहभागी झाले.

आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज
ग्रंथालय
रामानंदनगर (बुर्ली)

केसरी 30 July 2021

# मानसिक स्वास्थ्य यशाची गुरुकिल्ली

## -डॉ. अजित पाटील

केसरी वृत्तसेवा

कुंडल : सुस्थितीतील मानसिक स्वास्थ्यच विद्यार्थ्याला यशाच्या शिखरापर्यंत नेऊ शकते. पालकांसह शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे काळाची गरज बनली आहे. आभासी समाज माध्यमांपासून त्यांना परावृत्त केले पाहिजे, असे मत डॉ. अजित पाटील यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य संवर्धन' या विषयावर ऑनलाईन कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी उपप्राचार्य व्ही. बी. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमीत कमी केला पाहिजे. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनानुसार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संयोजन प्रा. संदेश दौंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. आभार प्रा. अमोल जमदाडे यांनी मानले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)


सकाळ | सांगली

सांगली, शुक्रवार, २ जुलै २०२१

# शाहूंनी बहुजनांसाठी कृतिशीलता जपली

## डॉ. टी. एस. पाटील; रामानंदनगरला डॉ. कदम महाविद्यालयात व्याख्यान

किर्लोस्करवाडी, ता. १ : राजर्षि शाहू महाराज लोकराजे होते. ब्रिटिश सत्तेच्या काळातही सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजनांच्या सामाजिक उन्नतीसाठी त्यांनी कृतिशीलता जपली, असे मत इतिहासाचे अभ्यासक डॉ. टी. एस. पाटील यांनी रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त ऑनलाईन व्याख्यानात केले.



डॉ. टी. एस. पाटील

ते म्हणाले,"सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी दलित, मागासवर्गीयांच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. सक्तीचे प्राथमिक शिक्षण, नोकऱ्यांत आरक्षण, शेती सुधारणांस प्रोत्साहन, पाणी व्यवस्थापनासाठी धरणांची बांधणी करून बहुजनांच्या कल्याणाचे पायाभूत कार्य केले. आजच्या पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा राहिला."

प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी राजर्षी शाहूंच्या सामाजिक शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले,"राजर्षी शाहूंनी खऱ्या अर्थाने जातिनिर्मूलन, अस्पृश्यता निवारण, सक्तीचे शिक्षण, आधुनिकीकरणासाठी पाठबळ देऊन आजच्या महाराष्ट्राचे चित्र निर्माण केले. राजर्षींच्या विचारांना आपण समाजजीवनात उतरवणे हेच अभिवादन होईल."मराठी विभाग आणि सांस्कृतिक विभागाच्या विद्यमाने "राजर्षी शाहूजांच्या कार्याची आजच्या संदर्भातील प्रस्तुतता' विषयवार व्याख्यान झाले.डॉ. तेजस चव्हाण, प्रा. दिलीप कोने, प्रा. स्वाती मगदूम उपस्थित होते.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY RAMANANDNAGAR (BURLI)

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA LIBRARY RAMANANDNAGAR (BURLI)

लोकमत जून 21 - 2021

लोकमत

# आपत्ती व्यवस्थापन कौशल्ये विकसित करा : सुपनेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**दुधोंडी** : भारताला सातत्याने नैसर्गिक संकटांशी सामना करावा लागतो. दुष्काळ, त्सुनामी, भूकंप, हिमस्खलन, महापूर, अपघात यांसारख्या संकटांमध्ये प्रचंड मनुष्य आणि वित्तहानीला सामोरे जावे लागते. येणाऱ्या काळात राष्ट्राचे या नैसर्गिक आणि मानवनिर्मिती संकटांपासून संरक्षण करायचे असेल तर तरुणांमध्ये आपत्ती व्यवस्थापन कौशल्ये विकसित करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सेंटर फॉर डिझास्टर मॅनेजमेंट यशदा, पुणे येथे येथील अपत्ती व्यवस्थापन कक्षाचे संचालक कर्नल व्ही. एन. सुपनेकर यांनी केले.

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामार्फत आयोजित ऑनलाईन व्याख्यानामध्ये ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम अध्यक्षस्थानी होते. कर्नल व्ही. एन. सुपनेकर म्हणाले,"संकटकाळामध्ये केवळ अज्ञानामुळे तरुणांना अपघातग्रस्तांना मदत करता येत नाही. आपत्ती काळात संकटात सापडलेल्या व्यक्तिला आपण कशा पद्धतीने मदत करायला पाहिजे, याबाबतचे कोणतेही शिक्षण आपल्याकडे शाळा, महाविद्यालयांमध्ये दिले जात नाही. ज्यामुळे आपल्या राष्ट्राचे दिसून न येणारे पण प्रचंड मोठे नुकसान होते. त्यामुळे तरुणांनी अशा प्रकारची प्रशिक्षणे आत्मसात करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट संदेश दौंडे यांनी स्वागत केले. डॉ. तेजस चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. धनेश गवारे यांनी आभार मानले.

Hello Sangli
Page No. 3 Jun 21, 2021
Powered by: erelego.com

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ दि. २०/६/२०२१

सकाळ

# तरुणांमध्ये आपत्ती व्यवस्थापन आवश्यक

## कर्नल सुपनेकर यांचे ऑनलाईन व्याख्यान

किर्लोस्करवाडी, ता.१९ : भारत हा सातत्याने नैसर्गिक संकटांशी सामना करत असतो. दुष्काळ, सुनामी, भूपंक, हिमस्खलन, महापूर, अपघात यासारख्या संकटांमध्ये प्रचंड मनुष्य आणि वित्त हनीला सामोरा जात आहे. तेव्हा येणाऱ्या काळात राष्ट्राचे या नैसर्गिक आणि मानवनिर्मिती संकटांपासून संरक्षण करायचे असेल तर तरुणांमध्ये आपत्ती व्यवस्थापनासंदर्भातील कौशल्ये विकसित करणे काळाजी गरज आहे.'' असे प्रतिपादन कर्नल व्ही. एन. सुपनेकर यांनी रामानंदनगगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामार्फत आयोजित ऑनलाईन व्याख्यानामध्ये केले.

सुपनेकर हे पुणे स्थित सेंटर फॉर डिझास्टर मॅनेजमेंट यशदा, पुणे येथे अपत्ती व्यवस्थापन कक्षाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. ते पुढे म्हणाले, ''संकटकालामध्ये अज्ञानामुळे तरुणांना अपघातग्रस्तांना मदत करता येत नाही. आपत्ती काळात कशापद्धतीने आपण संकटातात सापडलेल्या व्यक्तीला मदत करायला पाहिजे.'' डॉ. कदम यांनीही आपत्तीनंतर उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. एन.सी.सी. लेफ्टनंट संदेश दौंडे यांनी स्वागत केले. आभार प्रा. धनेश गवारे तर सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण यांनी केले.

Sangli, Main
20/06/2021 Page No. 10

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)

सकाळ | सांगली
सांगली, बुधवार, १६ जून २०२१
TODAY

# ‘साने गुरुजींमुळे पिढी सुसंस्कृत

## महाले; रामानंदनगर महाविद्यालयात व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

किर्लोस्करवाडी, ता.१५ : ‘साने गुरुजींनी मराठी मनावर नैतिकतेचा संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. ज्ञानेश्वर आणि तुकारामांच्या नंतर आपल्या परंपरेचे एक सर्वसमावेशक चित्र उभा करण्याची महान कृती साने गुरुजींनी आपल्या साहित्यातून केली आहे. सुसंस्कृत राष्ट्र निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे वाङ्मयीन कार्य गुरुजींनी आपल्या साहित्य लेखनातून केले आहे, असे मत डॉ. कैलास महाले यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथीलं डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वतीने साने गुरुजींच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने ‘साने गुरुजी व्यक्तित्व, जीवन आणि वाङ्मय’ अशा विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ते पुढे म्हणाले, ‘‘साने गुरुजींनी लोकसाहित्य, अनुवाद, संस्कृतिअभ्यास, कथा, कादंबरी, कविता, ललित लेखन यासारखे भरीव वाङ्मयीन कार्य करून ही मराठी समीक्षेने त्यांना उपेक्षित ठेवले. तसेच एक किसान- कामगार आणि अस्पृशांसाठी झटणारा एक कृतिशील समाजसुधारक असतानाही महाराष्ट्राकडून त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली. ही गोष्ट खरोखर चिंतनीय आहे.’’ असे विचार मांडत त्यांनी साने गुरुजींच्या जीवनातील अलक्षित पैलूंवर प्रकाश टाकला.

प्राचार्य डॉ. एल. डी. कदम म्हणाले, ‘‘साने गुरुजी यांच्या संवेदनशील, सहृदयी स्वभावामागे त्यांच्या आईचे खूप मोठे संस्कार होते. खरा तो एकची धर्म प्रार्थना लिहणाऱ्या साने गुरुजींनि खऱ्या अर्थानि भारतीय मुलांना आदर्श राष्ट्रनिर्मितीचे संस्कार दिले. ऑनलाईन व्याख्यानासाठी उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील आणि डॉ. काकासाहेब भोसले यांच्यासह सर्व अध्यापक, सेवकवृंद आणि महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. तेजस चव्हाण, आभार मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने, तर आभार प्रा. स्वाती मगदूम यांनी केले. तंत्रसहाय्य प्रा. दिनेश ससाणे यांनी केले.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDHALAYA
LIBRARY
RAMANANDNAGAR (BURLI)